# सरदार सरोवर: विकास की विनाश?

मेधा पाटकर

नर्मदेवरील धरण-प्रकल्प

# सरदार सरोवर : विकास की विनाश ?

मेधा पाटकर

नर्मदा धरणग्रस्त समिती, महाराष्ट्र
यांच्या वतीने प्रकाशित

परिसर

'यमुना', आय.सी.एस्. कॉलनी,
गणेशखिंड रस्ता, पुणे ४११ ००७

।। पुस्तिका विकत घ्या ।। प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याला हातभार लावा ।।

प्रकाशक :
परिसर, 'यमुना', आय.सी.एस कॉलनी,
गणेशखिंड रोड, पुणे ४११ ००७

मुद्रक :
मुद्रा, ३८३ नारायण पेठ,
पुणे - ४११ ०३०

© नर्मदा धरणग्रस्त समिती, महाराष्ट्र

प्रथम आवृत्ती नोव्हेंबर १९८८

~~देणगी मूल्य १० रुपये~~

## अनुक्रमणिका :


१. प्रास्ताविक

२. सरदार सरोवर : विकास किती विनाश किती ? ......१

- मेधा पाटकर

३. परिशिष्टे : १) नर्मदा खोरे विकास परियोजना - माहिती ......१६

२) केंद्रीय वनखाते व पर्यावरण खाते यांची सशर्त मंजुरी-पत्रे ......१८

३) सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांकडून पुनर्वसनासंबंधी मागण्यांचे निवेदन ......२३

४) सरदार सरोवर प्रकल्पास संपूर्ण विरोध जाहीर करणारे निवेदन ......२९

५) सरदार सरोवर प्रकल्प : घटनाक्रम ......३२

# प्रस्तावना

गुजरातमधील भडोच जिल्ह्यात केवाडिया नवागाम येथे नर्मदा नदीवर सरदार सरोवर या नावाचे महाप्रचंड धरण बांधले जावयाचे आहे. मध्यप्रदेशातील खांडवा जिल्ह्यात पुनासा येथे बांधल्या जावयाच्या नर्मदा सागर या दुसऱ्या महाप्रचंड धरणाची सरदार सरोवरशी सांगड घातलेली आहे. नर्मदेच्या संपूर्ण खोऱ्याचा 'विकास' करण्यासाठी जी सर्वंकष परियोजना कल्पिलेली आहे तिच्यामध्ये ह्या दोन धरणांखेरीज २८ मोठी, सुमारे १३५ मध्यम व ३००० हून जास्त लहान धरणे बांधली जावयाची आहेत. सरदार सरोवर व नर्मदा सागर ही दोन धरणे तीव्र वादात सापडलेली आहेत.

पर्यावरणाची हानी, विस्थापितांच्या योग्य पुनर्वसनाचा अभाव आणि लाभ-हानी प्रमाणाची शंकास्पदता या तीन अंगांनी वरील धरणांविरुद्ध अनेकानेक आक्षेप पर्यावरणवादी संघटना व व्यक्ती, विस्थापितांमध्ये काम करणाऱ्या संघटना व धरणप्रकल्पांच्या लाभ-हानी प्रमाणांचा विशेष अभ्यास असणाऱ्या जाणकार यानीं घेतलेले आहेत.

सरदार सरोवर प्रकल्पामुळे विस्थापित होणार असलेल्या लोकांमध्ये गेली तीन-चार वर्षे सतत व अथक काम करण्याबद्दल मेधा पाटकर यांचे नाव आज सर्वांच्या परिचयाचे आहे. 'परिसर' तर्फे ४ जून १९८८ रोजी पुण्यात त्यांचे व्याख्यान आयोजित केले होते. विस्थापितांचा कैवार घेऊन त्यांची बाजू मेधा पाटकर यांनी समर्थपणे व अत्यंत प्रभावीपणे मांडली. त्यांचे व्याख्यान पुस्तिकारूपाने प्रसिद्ध करावे अशी अनेकांनी मागणी केली.

त्यांच्या भाषणानंतरच्या साडेतीन महिन्यांच्या काळात घडामोडी वेगाने घडत गेल्या आहेत. महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश सरकारे, नर्मदा प्राधिकरण (एन.सी.ए), केंद्र सरकार व जागतिक बँक या चार यंत्रणांचा सरदार सरोवर प्रकल्पाशी संबंध आहे. विस्थापितांना पूर्ण न्याय मिळावा या उद्देशाने या चारही पातळ्यांवर वाटाघाटी व सनदशीर मार्गाने पराकाष्ठेचे प्रयत्न केले गेले. पण विस्थापितांना न्याय मिळणार नाही याची दिवसेंदिवस जास्तच खात्री पटत गेली. ती हकीकत या पुस्तिकेमध्ये समाविष्ट केलेल्या मेधा पाटकर यांच्या लेखनातून उत्तम प्रकारे समोर येते. श्रीमती पाटकर यांचा प्रस्तुत लेख मुळात 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये दोन भागांमध्ये प्रसिद्ध झालेला आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' च्या सौजन्याने आम्ही तो येथे पुनर्प्रकाशित करीत आहोत. अखेरीस सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेशामधील संघटनांनी या दोन धरणांना—कारण व्यवहारात या दोन धरणांची जोडगोळी आहे—संपूर्ण विरोध करण्याचा निर्णय १८ ऑगस्ट रोजी जाहीर केला आहे.

अशा रीतीने, ही पुस्तिका प्रकाशित करण्याचे वेळी सरदार सरोवर व नर्मदा सागर धरणांचे बांधकाम स्थगित केले जावे व या दोन धरणांविषयी आमूलाग्र पुनर्विचार केला जावा या मागण्यांसाठी एका व्यापक लढ्याला तोंड फुटले आहे.

मोठ्या प्रमाणावर वीज उत्पादन, शेतीसाठी लाखो एकरांना पाणी व गावोगावच्या लोकांना पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा हे तीन प्रमुख लाभ सांगितले जातात. इतके महत्त्वाचे लाभ, इतक्या प्रमाणावर व विस्तीर्ण क्षेत्रावर पदरात पडत असतील तर जंगलांचा नाश, वन्यजीवनाचा नाश व अन्य स्वरूपाची पर्यावरणाची हानी यांचा फार बाऊ करू नये अशी भूमिका भलेभले लोक घेत असतात. वन्यजीवन, जंगले यांचा नाश तुलनेने क्षुल्लक असतो असे सुचविले जाते. पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनाची गोष्ट करणाऱ्यांचा असा दावा आहे की, अगदी व्यवहार्य दृष्टिकोन बाळगला तरी, या हानीचे प्रमाण प्रचंड आहे. ते विचारात घेतले तर लाभ-हानी प्रमाण आतबट्ट्याचे ठरते.

धरण प्रकल्पांचे लाभ ज्या क्षेत्रातील लोकांच्या पदरात पडणार असतात त्या क्षेत्रातील जमिनींची मोठ्या प्रमाणावर खराबी, पाणलोट क्षेत्रांचा ऱ्हास, धरणांचे झपाट्याने गाळाने अकाली भरुन जाणे, रोगराईच्या

प्रादुर्भावाला व विस्ताराला निमंत्रण, भूकंपाचा धोका इत्यादी अनेक प्रकारची हानी होते असे आता जगभर ध्यानात येत आहे. मोठ्या धरणांना विरोध करणाऱ्यांच्या दृष्टीने मोठ्या धरणांपासून लाभक्षेत्रात सर्वसामान्य लोकांचेही, दूरदृष्ट्या विचार करता, कल्याण होत नाही. अल्पसंख्य मंडळींच्या फायद्यासाठी समाजाला फार मोठी किंमत द्यावी लागते. * जंगले, वन्यप्राणी यांचा अवास्तव कळवळा बाळगूनच पर्यावरणवादी मोठ्या धरणांना विरोध करीत आहेत हा समज चुकीचा आहे.

पर्यावरणाच्या अंगाने मोठ्या धरणांना विरोध करणाऱ्यांचा सरदार सरोवर व नर्मदा सागर या अती महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना विरोध प्रथमपासून होताच. आता विस्थापितांना न्याय न मिळण्याची पूर्ण खात्री झाल्याने विस्थापितांच्या मध्ये काम करणाऱ्या संघटनांनीही या दोन धरणांना पूर्ण विरोध जाहीर करून विस्थापितांचा आवाज पर्यावरणवाद्यांच्या आवाजात मिळविला आहे. ही ऐतिहासिक महत्त्वाची घटना आहे. आजपर्यंत वेगळे राहिलेले, परस्परांना विरोधी मानणारे प्रवाह एक झाले आहेत.

विस्थापितांचे सुयोग्य पुनर्वसन या बाबीस अग्रक्रम देण्याची भूमिका देखील अंतिमतः मोठ्या धरणांच्या विरोधात अटळपणे कशी परिणत होते ही गोष्ट सरदार सरोवर प्रकल्पाच्या उदाहरणातून चांगल्या प्रकारे दिसून येते. विस्थापितांना पूर्ण न्याय मिळाल्यावरच विकास प्रकल्प राबवावेत अशी भूमिका जर आग्रहाने लावून धरली तर, विकासाची प्रचलित व्याख्या व त्याचा आशय यांची आमूलाग्र पुनर्मांडणी करणे आवश्यक ठरते असा बोध यापासून घेता येण्यासारखा आहे.

या पुस्तिकेचे लक्ष्य सरदार सरोवर प्रकल्प हेच आहे. त्यातही विस्थापितांवरच मुख्य भर आहे. नजिकच्या भविष्यकाळात नर्मदासागरसहित संपूर्ण नर्मदा खोरे विकास परियोजनेची चिकित्सा सादर करणारी, एकंदरीतच मोठ्या धरणप्रकल्पांच्या सामाजिक-पर्यावरणीय परिणामांची स्पष्टता करणारी पुस्तिका 'परिसर' तर्फे प्रकाशित करण्याची योजना आहे.


सरदार सरोवर व नर्मदा सागर धरणप्रकल्पग्रस्त लोकांचा निसर्ग व पर्यावरणाचा लढा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नांची शर्थ केली पाहिजे.

---

** मोठ्या धरणांचा विपरीत-सामाजिक व पर्यावरणीय परिणाम अधिक सांगोपाग जाणून घेण्याच्या दृष्टीने पुढील दोन प्रकाशने पहावीत.*

*(१) गोल्डस्मिथ व हिल्डियार्ड : ''सोशल अँड एंव्हायरनमेंटल इफेक्टस ऑफ लार्ज डॅम्स'', खंड १, वेडब्रिज इकॉलॉजिकल सेंटर, इंग्लंड, १९८४.*

*(२) ''जलसिंचन आणि पर्यावरणाचे संतुलन'', परिसर प्रकाशन, पुणे, १९८८.*



छाया : पल्लव बागला

सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या विराट मोर्चाचे दृश्य

# सरदार सरोवर : विकास किती, विनाश किती?

मेधा पाटकर

धरणे, वीज-प्रकल्प, खाणी, मोठमोठे उद्योग इ. च्या रूपाने एक 'विकास' चक्र भरधाव वेगाने निघाले आहे. साबणापासून पंचतारांकित हॉटेल्सपर्यंत फोफावत गेलेल्या, जाणाऱ्या भौतिकवादाला पोसण्याकरिता त्याची आवश्यकता आहेच! 'नैसर्गिक व मानवी साधन-संपत्तीचा वापर न करता, राष्ट्राचा विकास कदापि शक्य आहे का?' असा प्रश्न करून सर्वच प्रकारे ही साधनसंपत्ती ओरबाडण्यामागे आपले समाजधुरीण लागले आहेत. नाही म्हणायला पर्यावरण दिनाच्या निमित्ताने किंवा पंचवार्षिक योजनांच्या काही पानांपुरते नैसर्गिक संपत्तीचा दूरदृष्टीने वापर करण्याचे उद्घोष जरूर होत आहेत. परंतु जोडीनेच जागतिक बँकेच्या वाढत्या हस्तक्षेपाच्या सहाय्याने, सशर्तच पण मंजुरी देऊन रेटल्या जाणाऱ्या 'वादग्रस्त' प्रकल्पांची संख्याही वाढत आहे.

एकीकडे मोठमोठ्या कंत्राटदारांपासून ते पाच वर्षांचेच आयुष्य मानून जगणाऱ्या राजकारण्यांपर्यंत बऱ्याच शक्तींचा या प्रक्रियेला निःशंक पाठिंबा आहे. तिच्या बाबत प्रश्न उभे करणाऱ्यांवर 'विकास विरोधी' वा 'देशद्रोही' असल्याचा आरोप आदळत आहे. तरीही पूर्वीप्रमाणे या प्रकल्पांना जनसामान्यांची तसेच त्यांच्याशी जोडलेल्या शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, सामाजिक कार्यकर्त्यांची तरी निर्विवाद मान्यता मिळणेही कमी होते आहे.

## गृहिताला तडे

'सार्वभौम शासना'ने 'सार्वजनिक हिता'साठी घेतलेला प्रकल्प हा घटनात्मक मूल्यांच्या चौकटीत, विकासाच्या उद्दिष्टांना पूरक, तंत्रज्ञानाच्या परिपूर्णतेसह, सामाजिक व पर्यावरणीय परिणामांसकट लाभहानीचा निःपक्षपाती आढावा घेऊनच आयोजिलेला असणार, या गृहिताला दिवसेंदिवस तडे जात आहेत. शेकडो शासकीय संस्था-यंत्रणांच्या जंजाळातहीं ज्या प्रकारे प्रकल्पांबाबत निर्णय घेतले जात आहेत, प्रकल्पांमुळे उद्ध्वस्त होणाऱ्या समाजघटकांच्या ज्या कहाण्या ऐकू येत आहेत व तुटपुंज्याच प्रकल्पोत्तर पाहण्यांतून लाभ-हानीच्या मूळ अंदाजांची जी उलथापालथ दिसून येत आहे त्यातूनच, हात रक्तबंबाळ होण्याची भीती न बाळगता या अवाढव्य चक्राच्या आऱ्याला पकडण्याचे प्रयत्न कानाकोपऱ्यात, दऱ्याखोऱ्यात चालू झाले आहेत.

## जगातील भव्य योजना

जगभर गाजत असलेला 'नर्मदा' प्रकल्प याचे उत्तम उदाहरण आहे. नर्मदा व तिच्या उपनद्यांवर उभारावयाच्या ३४३० (जागतिक बँकेचा आकडा. सरकारचा ३१६५) लहानमोठ्या योजनांची 'नर्मदा खोरे विकास योजना' ही विश्वातील सर्वात भव्य खोरे योजना मानली जावी. त्यातील ३० मोठ्या धरण-वीज प्रकल्पांपैकी ४ पूर्ण झाल्यावर, 'सरदार सरोवर' व 'नर्मदा सागर' हे सर्वात मोठे प्रकल्प किमान ३० वर्षांच्या निर्णयप्रकियेनंतर आजही वादालाच तोंड देत आहेत.

अनेक वर्षांच्या नर्मदा पाणीतंट्यावर खोसला कमिशनचा (१९६४) अहवाल मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात यांचा वाद सोडवू शकला नाही, तेव्हा नर्मदा पाणीतंटा न्यायाधिकरण नेमून १९७८-७९ मध्ये निवाडा मिळवला गेला. नर्मदेत पाणी किती मानायचे व पाण्याच्या किती टक्के अवलंबितेवर योजना

छाया : पल्लव बागला

आखावयाची, राजस्थान, महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश यांना किती पाणी उपलब्ध मानायचे हे महत्त्वाचे निर्णय प्रत्यक्ष न्यायाधिकरणाने नव्हे, तर संबंधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांमध्ये केंद्राच्या मदतीने झालेल्या १९७४ च्या (राजकीय) करारानुसार घेतले गेले. न्यायाधिकरणाने 'हा आमचा निर्णय नाही' व '१९५६ चा आंतरराज्य पाणीतंटा कायदा अशा करारांना न्यायाधिकरणाने मान्यता देण्याविषयी काही सुचवत नाही' असा स्पष्ट उल्लेख करून पण ते मान्यही केले! आणि बहुतांशी त्यावरच आधारित सरदार सरोवर धरणाची उंची, नर्मदा सागर व सरदार सरोवरमधील देवाणघेवाण, सरदार सरोवराच्या लाभ-किंमतीचे मध्य प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र व राजस्थान यांमध्ये वाटप, सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी किमान तरतूद व संबंधित यंत्रणा या निवाड्यातून निश्चित केली गेली.

स्वातंत्र्योत्तर काळात बांधल्या गेलेल्या (काही चालू) सुमारे २७०० हून अधिक धरणांप्रमाणेच पाणलोट क्षेत्र, लाभधारक क्षेत्र, वनसंपत्तीवरच काय, पण विस्थापितांवरही होणाऱ्या परिणामांची संपूर्ण शहानिशा यात कुठेच नव्हती. वास्तविक हे सर्व प्रश्न १९५० मधील भाक्रापासून ते १९७० मधील नर्मदेच्या खोऱ्यातीलच 'तवा' धरणापर्यंत सर्वत्र उभे राहिले होते. तरीही त्यांचा निश्चित विचार आवश्यक मानला गेला तो १९८० चा जंगल संरक्षण कायदा व त्यानिमित्ताने केंद्रीय 'पर्यावरण, जंगल व वन्यप्राणी विभाग' अस्तित्वात आल्यानंतरच! खोरे/धरण योजनांना या विभागाद्वारा पर्यावरणीय मंजुरी व त्याकरिता विविध शास्त्रीय अभ्यास व पर्यावरण संरक्षण योजनांची अट लावण्यात आली.

सरदार सरोवर व नर्मदा सागरलाही ती लागू झाली. १९८० ते १९८६ चा काळ या प्रकल्पांविषयी पर्यावरणीय परिणाम, भूगर्भशास्त्रीय (भूकंपाची शक्याशक्यता व उपाय) परिणाम, पाणलोट क्षेत्रात गाळाचे प्रमाण मर्यादित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना, इ. विषयी विविध अभ्यास सरकारी, बिनसरकारी संस्थांकडून करवून घेण्यात गेला, असे दिसते. १९८३ मध्ये टाटा इकॉनॉमिक कन्सल्टन्सी सर्व्हिसेसद्वारा सरदार सरोवरच्या लाभ-हानीचे प्रमाण काढवून घेतले गेले. पण हे सारे कशा प्रकारे, कुठवर घडले?

आपण सरदार सरोवरचेच उदाहरण घेऊ.

## अपुऱ्या माहितीवरील अहवाल

सरदार सरोवरच्या 'पर्यावरणीय परिणामा' चा अभ्यास बडोद्याच्या एम.एस. विद्यापीठात सहा महिन्यांत केला गेला. अहवाल अनेक मर्यादांचा वारंवार उल्लेख करणारा! इतर अनेक संबंधित संशोधने अपुरी असताना, नेमके पाणलोट क्षेत्र किती, बुडणारे जंगल किती, विस्थापित कुटुंबे किती याची माहितीही अपुरीच असताना हा अहवाल लिहिला गेला. मुख्यतः सरकारी (न जुळणारीही) आकडेवारी, तुटपुंजे प्राथमिक सर्वेक्षण इ. च्या माहितीवरच आधारला गेला. मग बुडणाऱ्या जंगलांचा, भोवतालच्या जंगलाच्या गुरचरण वा इंधनासाठीच्या वापरावर अप्रत्यक्ष परिणाम, खोऱ्यातील इतर योजनांसह या योजनेचा एकत्रित परिणाम या बाबींचा अभ्यास दूरच! पाणलोट क्षेत्रावरील परिणाम जाणून प्रतिबंधक योजना सुचविण्यासाठी नेमलेल्या दिवाण कमिटीचा १९८५ चा अहवालही क्षेत्राच्या वैशिष्ट्यामुळे गाळ साचण्याची मोठी भीती असल्याचे मान्य करतो. ''पाणलोट क्षेत्राची गाळ साचण्याच्या शक्यतेशी संबंधित प्रमुख बाबींविषयी शास्त्रीय पद्धतीने पाहणी झालेली नाही.....आज उपलब्ध असलेली जमीन-वापराविषयीची आकडेवारी पूर्णतः सुधारण्याची गरज आहे. नर्मदा न्यायाधिकरण, राज्यांचे शेतीविभाग, मध्यप्रदेशचे वनखाते इ. च्या पाणलोट क्षेत्राविषयीच्या आकडेवारीतील तफावत दूर करणे आवश्यक आहे....'' असे अहवालात नमूद आहे. थोडक्यात, अपुऱ्या माहितीवरच आधारित अहवाल बाहेर आले. तरीही कित्येक अभ्यास तर १९८५-८६ पर्यत सुरूही केले नाहीत.

## ही आकडेवारी आली कुठून?

सन १९८३ मध्ये मांडलेल्या लाभहानीच्या आकडेवारीवरून जागतिक बँकेकडे मदतीची याचना होऊन १९८५ च्या मेमध्ये सरदार सरोवरसाठीच (धरण, वीजघर व कालव्यांचे जाळे मिळून) ४५० दशलक्ष

डॉलर्स मदतीचा करारही करण्यात आला होता. यावेळी कित्येक बाबींविषयीची पायाभूत माहितीही पूर्णपणे उपलब्ध नव्हती. सरकारची आकडेवारीही सतत बदलत असताना १.८४ हे लाभहानीचे प्रमाण दाखवण्यात आले. त्यात आरोग्यावरील परिणाम, वन्यसृष्टी तसेच मत्स्यधनावरील परिणाम व वर उल्लेखिलेले कितीतरी अप्रत्यक्ष नुकसान विचारातच घेतल्याचे दिसत नाही. पुनर्वसन, बुडणारे जंगल वा पर्यायी(?) वनीकरण यासाठी येणाऱ्या खर्चाचे सरकारी अंदाज, ढोबळ मानानेच विचारात घेतलेले दिसतात. १९८४ पर्यंत गुजरात सरकार तर्फे केंद्रीय नर्मदा प्राधिकरणाला सादर केलेल्या अहवालामध्ये १ हेक्टर बुडणारे जंगल व १ हेक्टर पर्यायी वनीकरण याची एकत्रित किंमत फक्त १४६ रु. दाखवली गेली होती, या एकाच उदाहरणावरून सारे स्पष्ट होईल. (सरकारच्याच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या प्रस्तावानुसार १ घनतेचे १ हेक्टर जंगल बुडण्याने होणारे नुकसान—जमीन, वायू इ. वरील परिणाम धरून—१२६ लाखांच्या घरात जाते.) सरदार सरोवरासाठी तिन्ही राज्यांतील पाणलोट क्षेत्र-संरक्षण योजनेचा, पुनर्वसनाचा वा इतर कुठल्याही पर्यावरणीय अभ्यासाचा, उपाययोजनेचा नेमका खर्च या गणितात धरण्याचा संभवच कुठे उद्भवतो? दिवाण कमिटीच्या अंदाजाप्रमाणे पाणलोट क्षेत्रावरच ५२० कोटी रु. खर्च अपेक्षित होता. आजवर वाढत आलेल्या सरकारी अंदाजाप्रमाणे तो १७०० ते २००० कोटींवर आला आहे. परंतु अजून आयोजनच बाकी आहे. पुनर्वसनाचाही आराखडा तयार नाही. विस्थापितांची संख्या, आवश्यक जमीन, त्या जमिनीची किंमत सारे ठरल्याविना ही आकडेवारी आलीच कुठून?

प्रकल्पाच्या लाभांपुढे या किमती नगण्य असल्याची भूमिका आयोजनकर्त्यांनी व मूल्यांकनकर्त्यांनीही प्रामुख्याने घेतली आहे. ती कुठल्याच आकडेवारीवरून समर्थन करता येण्याजोगी नाही. गुजरातेतील ३३४४ खेड्यांतील सुमारे २१ लाख हेक्टर्स जमिनीला सिंचाईचा लाभ, काही शहरे व ग्रामीण भागांसाठी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, कारखान्यांकरिता पाणी व १४५० मेगॅवॉट वीज हे मुख्य लाभ मांडले गेले आहेत. मात्र या लाभांविषयीही अनेक शंका अभ्यासक आज उपस्थित करत आहेत. अजून सखोल अभ्यास याबाबत बाकी असला, जरूर असला तरी काही गोष्टी ठळक आहेत. एक तर एवढी भव्य योजना पूर्ण होईल की नाही याविषयीच शंका जागतिक बँकेचे तंत्रज्ञ व सरकारी अधिकारी व्यक्तिगत पातळीवर घेताना आढळतात. गाळाचे प्रमाण, नर्मदा सागरावर प्रकल्पाचे अवलंबित्व, लाभक्षेत्रातील दलदलीचा संभव याचा पुरेसा आढावा न घेता, लाभ धरले आहेत. सुमारे ४० टक्के नगदी पिकांखाली असलेल्या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये अगोदरच सिंचित जमिनींमधील पिकातही दुपटी-तिपटीने वाढ होण्याची गृहित धरलेली शक्यता अतिशयोक्तीचीच वाटते. तीही बहुतेक सर्वच लाभक्षेत्रात संकरित बियाण्यांचा वापर सर्व शक्यतेइतका आजही झालेला आहे हे जागतिक बँकेच्या अहवालात मान्य केले असूनही! शेतीबाबत नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब म्हणजे त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण सेवाही, पाण्याचा योग्य वापर इ. गृहितांवरच फायदे अवलंबून असल्याने ही सारी गृहिते म्हणजे एक खेळच आहे. पाण्याचा वापर पिण्यासाठी व औद्योगिक केंद्रांसाठी किती प्रमाणात होणार ते स्पष्ट झालेलेच नाही. प्रकल्पाची जाहिरात 'पिण्याचे पाणी सौराष्ट्रापर्यन्त आणणार' अशी होत असली तरी त्याची खात्री कोण देणार?

विजेच्या लाभाविषयीच्या जाहिरातीची गंमतच असते. १४५० मेगॅवॅट वीज म्हणजे १४५० मेगॅवॅट क्षमतेच्या वीजघराची निर्मिती असे समजून घ्यायचे असते. सरदार सरोवराची वीजनिर्मिती, वर्षभर उपलब्ध वीज असे धरले तरी, सुरुवातीच्या काळात ३०० मेगॅवॅट व अखेरीस १५० मेगॅवॅट म्हणजेच सरासरी २२५ मेगॅवॅट एवढीच रहाणार आहे. वाढता गाळ व कमी होणारे पाणी यामुळे काय होईल, ते वेगळेच. याबाबत गुजरातच्याच उकाई धरणाचा अनुभव पदरी आहेच. दशक उलटले तरी तो प्रकल्प महाराष्ट्राला कबूल केल्यापैकी १ मेगॅवॅट वीजही देऊ शकलेला नाही. तेव्हा यातही २७% वीज महाराष्ट्राला व ५६% मध्य प्रदेशला असे वाटप मान्य करवून घेतले तरी प्रत्यक्षात काय होईल? इतकेच नव्हे, तर काळ्या मातीच्या लाभक्षेत्रात 'तवा' धरणाप्रमाणे दलदलीने जमीन निकामी होऊ नये म्हणून पुन्हा पंपांसाठी विजेचा वापर करावा लागणार. नर्मदा सागरसाठी हे प्रमाण ६.२ हेक्टर मागे एक पंप असे मांडले आहे. सरदार सरोवर करिता असा आकडा किंवा लाभक्षेत्रविकास कार्यक्रमही पूर्ण तयारच नाही मग किंमत कशी लावणार? प्रकल्पासाठी अहोरात्र वीजच नव्हे तर जंगलातील इंधनही (निव्वळ मजुरांकरिताही) जाळावे लागणार.

अशा गोष्टींचा विचार सोडाच! लाभाच्या गणितात कुणाला लाभ, कोणत्या बदलांचा लाभ याचा विचार प्रकल्पात केव्हा करतात? मध्य प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र यांच्यातील आर्थिक विषमता पाहून प्रकल्पाच्या लाभांच्या वाटपांचा [पाणी - ९१% गुजरात ९% राजस्थान, वीज-२७% महाराष्ट्र, ५६% म.प्र. व १७% गुजरात] प्रादेशिक समतेवर परिणाम काय हा प्रश्न गंभीरपणे विचारात घेतलेला नाही. न्यायाधिकरणाकडून 'राज्यांची गरज काय' असा प्रश्न विचारला गेलेला दिसला तरी त्याचा एकूण भर तंटा सोडवण्यावरच हे अभ्यासकाला स्पष्ट दिसते.

३५ टक्क्यांहून अधिक प्रमाण लाभधारकांत असलेल्या भूमिहीन शेतमजुरांना नगदी पिके आल्याने नेमके काय 'लाभ' मिळतील याचा अंदाज बांधण्याची संशोधनपद्धती तरी आपल्याकडे आहे का? उसाचे पीक, त्याच्या जोरावर साखर कारखाने, मोठ्या शेतकऱ्यांचे व सीमेवरच्या शेतकऱ्यांच्या जमिनी गमावण्याचे वाढते प्रमाण आणि ऊसकापणीसाठी दिवसरात्र उपलब्ध होऊ शकणारा स्थलांतरित मजूर, हे वा असे बदल लाभ मानायचे का, हाही प्रश्न कुठे गणिती विचारात बसत नाही.

जागतिक बँकेनेही बहुतांशी सरकारीच आकडेवारीवर सरदार सरोवराचे मूल्यांकन पूर्ण करून 'इकॉनॉमिक रेट ऑफ रिटर्न' १३ दाखविला. अपुरे अभ्यास, सरकारी आकडेवारीतील उणिवा, नव्या आयोजनांमधून उद्भवणारे खर्च या बाबी त्यांना जणू ठाऊकच नव्हत्या! प्रकल्प वेळेवर पूर्ण झाल्यास हा दर १३, दोन वर्षांनी पुढे ढकलला गेल्यास १२ राहील. इतकेच नव्हे, तर हा दर १० च्या खाली येण्याची शक्यता १५ टक्क्यांहून अधिक असेल, असेही त्यातील कागदोपत्री नमूद करून ठेवले आहे! प्रकल्प मंजुरीसाठी नियोजन मंडळाने ठरवून दिलेला दर ११ आहे! प्रकल्पाचे वेळापत्रक १९८५ नंतरही किमान दोनदा सुमारे ४ ते ६ वर्षांनी तरी पुढे गेल्याचे अधिकृतपणे मांडले गेले आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे!

**शंकेस भरपूर वाव**

टाटा आर्थिक सल्लागार संस्थेच्या किंवा जागतिक बँकेच्या मूल्यांकनामागील उद्देश निःपक्षपाती अध्ययन व निर्णय होता का, अशी शंका घ्यायला भरपूर वाव आहे. टाटा सल्लागार संस्थेकडून हे अध्ययन ज्या प्रकारे करवून घेतले, त्याविषयी बरेच बोलले जाते. त्यांच्या अहवालाची सुरुवातही त्यांची गृहिते सूचित करते. ती अशी : "हा भव्य बहुद्देशीय प्रकल्प कित्येक बाबतींत जगातील अनेक मोठ्या प्रकल्पांशी ताकदीने स्पर्धा करणारा आहे. त्यामुळे फार मोठे क्षेत्र सिंचनाखाली येईल, मोठ्या प्रमाणावर वीजनिर्मिती होईल तसेच एरव्ही वारंवार येणाऱ्या पुरांचे नियंत्रणही होईल. सरकारने अत्यंत शास्त्रीय व वास्तववादी दृष्टीने, तुटपुंज्या साधनांच्या वापरातूनही प्रकल्प अधिकाधिक लाभदायक ठरेल अशा प्रकारे या प्रकल्पाची आखणी केलेली आहे."

जागतिक बँकेनेही या प्रकल्पास सहाय्यता मंजूर करण्यामागील जी कारणे दाखवली आहेत त्यांतील काही अशी : १) जागतिक बँकेच्या सहाय्यामुळे एरव्ही घेतला गेला नसता अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा, भव्यतेचा प्रकल्प भारताकडून हाती घेतला जाईल(!) २) बँकेच्या मदतीमुळे इतर परदेशी बँका वा सल्लागारांचा या प्रकल्पात प्रवेश होणे शक्य होईल. यामागोमागच बँकेच्या त्याच गोपनीय अहवालात पुढे असेही म्हटले आहे की, "अवाढव्य प्रमाण व गुंतागुंतीचे तंत्रज्ञान यामुळे या प्रकल्पात इतर कोणत्याही प्रकल्पापेक्षा अधिक जोखीम आहे. भारतातच नव्हे, तर जगातच अभूतपूर्व अशी ही योजना असल्याने, तिच्या अंमलबजावणीला कालापव्यय व किंमतीत वाढ हे दोन मोठे धोके संभवतात. लाभ घेणाऱ्या राज्यांतील आर्थिक व मानवी शक्तीचा यात प्रचंड प्रमाणावर वापर होणार आहे. गुजरात राज्याच्या एकविसाव्या शतकातील गरजा भागविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आखलेल्या या योजनेची कालबद्धता आंतरराज्य संयोजनावरच अवलंबून राहील. शिवाय, योजनेचा अपेक्षित लाभ पूर्णपणे मिळणे हे मध्यप्रदेशातील (नर्मदा सागर योजनेच्या) कालबद्ध अंमलबजावणीवर आधारित असेल.... हे धोके टाळण्यासाठी अनेक उपाययोजनांचा अंतर्भाव प्रकल्पाच्या आराखड्यात समाविष्ट केला आहे. जसे, विविध जबाबदाऱ्यांसाठी आवश्यक अशी सुसज्ज यंत्रणा...केंद्र सरकारकडून स्थानिक

साधनांना आर्थिक सहाय्याची जोड, इ.'' यातील कोणती गृहिते खरी ठरली किंवा ठरत आहेत ते पुढे पाहूच!

तूर्त जाणून घ्यायचे ते हेच की याच काळात प्रकल्पाचे कामही ४०० कोटी रु. (अर्थात एका माहितीनुसार त्यातील किमान २/३ व्यवस्थापनावरच खर्च झालेले!) पर्यंत पुढे गेले.

### नाईलाजाने मंजुरी

१९८६ च्या सुरवातीपासून केंद्रीय पर्यावरण विभागाने सरदार सरोवर व नर्मदा सागर या दोन्ही प्रकल्पांची मंजुरी अडवल्याच्या बातम्या, मध्य प्रदेश व गुजरातमधील काही वाद, गुजरात सरकारचा केंद्रावर दबाव आणण्याचा प्रयत्न या निमित्ताने विशेष रूपाने बाहेर आल्या. अगदी १९८६ एप्रिलपर्यंत विविध अभ्यास व योजना अपुऱ्या असून त्या शिवाय प्रकल्पाचे मूल्यांकनच पूर्ण होऊ शकत नाही हीच केंद्राची भूमिका राहिली. आणि स्थितीत नवीन कोणताच बदल झाला नसताना १३ एप्रिल रोजी पंतप्रधान व संबंधित राज्यांचे मुख्यमंत्री यांनी एकत्रच या प्रकल्पास मंजुरी (सशर्त) देण्याची गरज मान्य केली. तसे होताच २४ जून १९८७ रोजी पर्यावरण विभागाने 'नाईलाजाने' मंजुरी दिली.

### हे कितपत योग्य?

नाईलाजाने याकरिता म्हणायचे की मंजुरी-पत्रकातच सरदार सरोवर व नर्मदा सागर दोन्ही प्रकल्पांबाबत आठ विषयांवरील संशोधन / आयोजन बाकी असून १९८९ पर्यंत ते पूर्ण होणार नाही असे स्पष्ट नमूद केले गेले. विस्थापितांचे पुनर्वसन, पाणलोट क्षेत्र संरक्षण योजना, लाभधारक क्षेत्रसुधार योजना, पर्यायी वनीकरण, वनस्पती व वन्यजीवन, आरोग्यावरील परिणाम व भूकंपशास्त्रीय अध्ययन हे ते विषय! नर्मदा संचालन प्राधिकरणाकडे हे काम प्रकल्पासह वेळेवर पूर्ण होईल याची जबाबदारी टाकून मंजुरी देण्यात आली. पाठोपाठ जंगल संरक्षण कायद्याखाली आवश्यक अशी जंगल ज़मीन प्रकल्पासाठी वापरण्यास मंजुरीही सरदार सरोवरासाठी ८ ऑक्टोबर १९८७ रोजी दिली गेली. याहीवेळी पुनर्वसनासाठी आवश्यक जमिनीचा तपशील ३० नोव्हेंबर १९८७ पर्यंत, पर्यायी वनीकरणाचा तपशील ३० सप्टेंबरपर्यंत देण्याच्या व इतर अटी घालण्यात आल्याच!

या संदर्भात प्रश्न उरतो तो म्हणजे संशोधनातून प्रकल्पासंबंधीचे निष्कर्ष काढावयाचे असताना आयोजनाच्या परिणामकारकतेवर प्रकल्पाचे आयुष्य व अनेक गंभीर परिणाम अवलंबून असताना, अशी सशर्त मंजुरी देणे कितपत योग्य? प्रकल्प बेछूट सुटल्यानंतर अशा मोठ्या प्रकल्पांचे तंत्रज्ञ ज्याबाबत एक तर अज्ञानात वा उदासीन आढळतात अशाच या साऱ्या बाबी! त्यावरील कार्य समयबद्ध व पूर्ण करण्याची खात्री कोण घेणार? सरदार सरोवरचे आयुष्य १८० वर्षे किमान मानण्यात आले आहे. पाणलोट क्षेत्रविकास न केल्याने, आजच भारतभरचा अनुभव गाळाचे प्रमाण मूळ अंदाजाच्या ३ ते ४ पट असण्याचा आहे. मग लाभकाळाची खात्री कोण घेणार? पुनर्वसनासाठी जमीन उपलब्धच नाही असे आढळल्यास शेकडो कोटी रु. प्रकल्पावर खर्च झाले असताना प्रकल्प कोण मागे घेणार?

### सखोल आयोजनाची गरज

मंजुरी मिळाल्यानंतरच्या घडामोडी नेमक्या याच प्रश्नांचे महत्त्व जाणवून देतात. जानेवारी १९८८ पर्यंत पर्यायी(?) वनीकरणासाठी जमीन सूचित करण्याचे कार्यच त्यामानाने पूर्ण झाले आहे. तीही गुजरातच्या कच्छ क्षेत्रात. सामाजिक व इतर वनीकरणाच्या आपल्या अनुभवावरून या रणात वन, तेही पिढ्यांच्या नैसर्गिक वनास पर्याय म्हणून उभे करण्याची शक्यता अजमावलेलीच बरी! लोकसहभागाचा आयोजनात उल्लेखच नाही. तर इतर विषयांवरील कार्य अत्यंत अपुरे असल्याचेच प्राधिकरणाचे मत झाले आहे. भूकंपशास्त्रीय निर्णयांसाठी पुण्याची संस्था (CWPRS) अजून माहिती गोळा करतच आहे. आरोग्यावरील परिणामांवर उपाय म्हणून स्कीस्टोसोमिओसिस, फिलेरिया या रोगांचा संभव नाकारता येत नाही असे जागतिक बँकेच्या व इतर तज्ज्ञांचेही मत असताना, केवडिया कॉलनी येथे हॉस्पिटल्स (आजही कर्मचाऱ्यांसाठी बांधलेली) व अधिक खाटा इ. ची नाममात्र योजनाच फक्त केली गेली आहे. पाणलोट

क्षेत्रापैकी किती भागावर वनीकरणाचे प्रकल्प घ्यावे लागतील याचा अंदाजच सतत बदलता असून त्याबाबत ६०,३०० हेक्टरवरून हे क्षेत्रफळ ४२,३०० हेक्टर्सवर आलेच कसे असा प्रश्न, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील क्षेत्राचा विचारच न केल्याची अुणीव, अधिक सखोल आयोजनाची गरज पर्यावरण विभाग पुनः पुन्हा मांडीत आहे. बाधित जंगलातील वनस्पतींचा व वन्यप्राण्यांचा अभ्यास सरदार सरोवरकरिता अजून बाकीच आहे. नर्मदासागर व संबंधित दोन प्रकल्पांच्या ३० ते ४०% क्षेत्रातील वनस्पतींचा अभ्यास झाला. त्यातच १५ दुर्मिळ व नष्ट होण्याची शक्यता असलेल्या जाती, इतर २० दुर्लभ जाती, ५४ औषधी वनस्पती, ६३ औद्योगिक वा आर्थिकदृष्ट्या लाभदायक वनस्पती, २७ आदिवासींना उपयुक्त वनस्पती. इ. मिळून ८०० प्रकार शोधले गेले आहेत. वन्यप्राण्यांचे संरक्षण या मुद्यावर अगदी अलीकडेपर्यंत 'वन्यप्राणी नाहीतच' वा 'ते आजूबाजूच्या जंगलात नेले जातील' अशी थातुर विधाने होत होती. आता अेका अभयारण्याचा विचार आहे इतकेच. ती योजना अजून उपलब्ध होअू शकलेली नाही. तरी तिच्यातही अधिक आदिवासींचा बळी व पैसा ओतणार ना! आणि सरकारी योजनाच असल्याने ती कितपत अंमलात येणार हे प्रश्न अुरतातच!

पुनर्वसनाचा अनुभव तर अत्यंत निराशाजनक व विस्थापितांचे भवितव्यच धोक्यात अशी स्थिती आहे. हे सर्व पूर्ण होणार की नाही, केव्हा व त्यातून प्रकल्पामुळे होणारी भयानक हानी व भरमसाट खर्चाचा निष्कर्ष निघाल्यास काय? तोवर १३७०० हेक्टर्स जंगल तोडून, बुडवून हजारो लोक विस्थापित केले गेल्यामुळे प्रकल्प पुढेच रेटणार ना?

**करार झालाच कसा?**

या देशातील नव्याने विचारात घेतलेल्या विस्थापन व पर्यावरणाच्या समस्यांकडे पाहणाऱ्या एकमेव अधिकृत यंत्रणेची (केंद्रीय पर्यावरण विभाग) मंजुरी मिळाली नसताना जागतिक बँकेशी करार झालाच कसा? आर्थिक मदतीबरोबरच सल्लागारांचा पुरवठाही करणाऱ्या या अवाढव्य यंत्रणेच्या दृष्टीने हे अपुरे अध्ययन, आयोजन निर्णयपूर्व होण्याची गरजच नव्हती काय? जागतिक बँकेसारख्या यंत्रणांना 'विकास व निर्मितीसाठी आंतर राष्ट्रीय बँक' असे नामाभिधान मिरवूनही अखेर त्यांच्याच एका अधिकाऱ्याने अधिकृत सभेत म्हटल्यानुसार 'सावकाराचीच भूमिका' पार पाडायची असते. अधिकाअधिक प्रकल्पांना जोडायचे असते व त्याहून अधिक सरदार सरोवर किंवा संपूर्णच नर्मदा खोरे योजनेसारख्या भव्य, दिव्य प्रकल्पांना! पण मग आपली कुवत, आपली आर्थिक, तांत्रिक ताकद, आपल्या कार्यवाहीची गती, आपल्या देशातील निर्णय यंत्रणा व देशाच्या प्राथमिक गरजा, सामाजिक न्यायाची उद्दिष्टे या साऱ्याच गोष्टी गहाण टाकून सरदार सरोवराच्या धरण व वीजप्रकल्पांसाठी १८ टक्के व पाणी-वाटप / कालवे योजनेसाठी ३० टक्के खर्च बाहेरून येताच, उरलेला पैसा कोठून किती बाँडस्वर किती व्याज देअून उभारायचा, केंद्रशासन देणार की नाही हे निश्चित नसताना, याच मुद्यावर प्लॅनिंग कमिशनने मंजुरी अजूनही बाकी ठेवली असताना पुढे रेटण्याची खरोखरच गरज किती?

**लाभांवर नक्कीच परिणाम**

पुनर्वसनासाठी निव्वळ जमिनीकरिताच ४५ कोटी रुपयेही जागतिक बँकेकडे मागायला जाण्याची पाळी आज गुजरात सरकारवर आली आहे. सरदार सरोवर प्रकल्पाचाच खर्च ४४०० कोटींवरून (१९८२ नुसार) १३,५०० कोटींवर गेल्याचे स्वतः मुख्यमंत्र्यांनीच डिसेंबर १९८७ मध्ये जाहीर केले आहे. कित्येक नवनवीन योजनांसाठी व जुन्या योजनांच्या नव्या किमतींमुळे खर्च वाढतोच आहे. त्यासाठी पैसा उभा करण्याच्या घोषणा होत असल्या तरी अजून निश्चिती नाहीच! अनेक प्रकल्पांप्रमाणे अखेरीस कालव्यांची कामे व इतर योजनाच अपुऱ्या राहिल्यास दलदल, क्षारकरण, गाळ इ. प्रश्नांपासून प्रकल्प वाचविणे अशक्य होणार आहे. 'नर्मदा सागर'चे एकूणच आयोजन कार्य, जागतिक बँकेची सहाय्य मंजुरी बाकी आहे. सरदार सरोवरचे २/३ पाणी नर्मदा सागरमधून वेळेवर मिळण्याची शक्यता पार दुरावली आहे. त्यामुळे निश्चितच

लाभावर परिणाम होणार आहे. नर्मदेतील पाण्याविषयीची १९७० पर्यंतची सरासरीही बदलली असून पाण्याचे प्रमाण २७.२ दशलक्ष अेकर फुटांच्या गृहीत अंदाजावरून २३ दशलक्ष अेकर फुटांवर आल्याची म्हणजेच सुमारे १५ टक्क्यांनी कमी असल्याचीही खात्रीलायक माहिती आहे. या परिस्थितीत, प्रकल्पाचे लाभ-हानीचे आकडे व विश्लेषण पुन्हा पडताळण्याची गरज न मानता, सारे संशोधन, आयोजन पूर्ण झाल्यावरच निश्चिंतपणे पुढे जाण्याचा विचार करण्याऐवजी सरदार सरोवर प्रकल्प प्रतिष्ठेचा प्रश्न बनवला गेला आहे! सरदार सरोवरची अुंची १९ फुटांनी कमी केली तरी विस्थापितांचे प्रमाण २०,००० ने व बुडणारी शेतजमीन २४००० अेकरने कमी होईल. त्याहीपेक्षा अुंची ४५५ वरून ३२० फुटांवर आणली तर अेकूणच प्रभावित क्षेत्र व लोकसंख्या, एका अत्यंत माहितगार सरकारी तंत्रज्ञाच्या म्हणण्यानुसार, आजच्या १० ते २०% वर येईल. विशेष हे की, या दोन्ही बाबतीत फक्त सरोवर रिते करण्याची किमान पातळी (मिनिमम ड्रॉ डाअून लेव्हल) जागतिक बँकेनेही पूर्वीच सुचवल्याप्रमाणे थोडी कमी धरली की वीजनिर्मितीवर परिणाम झाला तरी गुजरातमधील सिंचाईचे अपेक्षित प्रमाण कायमच राहील. १९८१ मध्ये म्हणजे न्यायाधिकरणाच्या निवाड्यानंतरही नर्मदा सागर व सरदार सरोवर प्रकल्पांमुळे होणारे सर्व नुकसान विचारात घेअून ते किमान करण्याच्या दृष्टीने सर्व पर्यायांचा अुघड मनाने विचार करण्याचा करार मध्यप्रदेश व गुजरातच्या मुख्यमंत्र्यांमध्ये झालेलाही आहे. असे असतानाही अुंचीबाबतही कसलाच विचार न करण्याची जाहीर घोषणा गुजरात सरकारने व तेथील सर्व राजकीय पक्षांनी केली आहे. उलट 'नर्मदा ही गुजरातची जीवदोरी' असल्याचा घोष करत आपल्या राजकीय भांडवलात त्यांनी मोलाची भर घातली आहे.

**हे सारे कुणाच्या जिवावर?**

या देशातील सर्वच करदात्यांचा अप्रत्यक्ष सहभाग यात खराच, परंतु सुमारे १ लाख लोकांना त्यांच्या आर्थिक-सामाजिक संदर्भातून संपूर्ण उखडून टाकल्याशिवाय हा प्रकल्प उभा राहूच शकत नाही. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरातमधील २५० च्या आसपास गावे (आकडा अजून बदलतोच आहे!) या प्रकल्पामुळे पूर्णतः वा अशंतः विस्थापित होतील, तेव्हाच हा प्रकल्प पुढे जाऊ शकेल. विस्थापितांत, गुजरात व महाराष्ट्रात (सुमारे २५ ते ३० हजार लोकसंख्या) जवळजवळ १०० टक्के, तर मध्य प्रदेशात ४० ते ८० टक्के (गाववार) आदिवासी आहेत. जंगलावर कमीअधिक अवलंबित्व, कायदेशीर कागपत्रांपेक्षा देवाणघेवाणीच्या नात्याने, हक्काने निसर्गसंपत्ती वापरण्याची पिढ्यानुपिढ्यांची जीवनपद्धती, बहुतांशी गरजेच्या वस्तू निसर्गातूनच कष्टाने मिळवून बाजारी जगाशी माठ, कपडा, मीठ, क्वचित तेल अशा चारदोन वस्तूंसाठीच संबंध असेच जीवन थोड्याफार फरकाने जगणारा हा आदिवासी समाज, बाह्य जगातील औपचारिक यंत्रणा, नियम, बंधनांपासून बराच दूर, स्वतंत्र पैशाच्या व्यवहारावर कमीत कमी अवलंबून. महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त प्रदेश बामणी मृत्युकांडामुळे प्रकाशात आलेला. स्वातंत्र्योत्तर काळातही जिथे सरकार जवळजवळ अस्तित्वातच नव्हते, असा. त्यांना जमिनी, जंगल, माती, नर्मदा याच साऱ्या निसर्गाभोवती गुंफलेली सामाजिक संस्कृती, रीतिरिवाज, संघटित वस्त्या, मर्यादित क्षेत्रातील नातीगोती यापासून तोडण्यात येणार!

**प्रत्येक प्रकल्प आघातावर उभा**

हे नवीन नव्हेच. आजवर हाती घेतलेला प्रत्येकच प्रकल्प कुणा ना कुणा समाजावर असा आघात करूनच उभारला गेला आहे. त्यातही सर्वाधिक प्रमाण आदिवासींचेच. निसर्गसंपत्तीचा विपुल साठा असलेल्या दऱ्याखोऱ्यांत, डोंगर कपारीत त्यांचेच वास्तव्य अधिक. एका केंद्रीय कार्यालयातील तुटपुंज्या माहितीनुसार सुमारे ११९ प्रकल्पांच्या विस्थापितांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक आदिवासींचे प्रमाण होते. एकूणच गरिबांच्या हातची संपत्ती छिनून घेणे हे विकासप्रकल्पांचे वैशिष्ट्य झाल्यागत. अशांची सर्व संपत्ती-संस्कृती 'सार्वजनिक हिता'च्या नावाखाली प्रकल्पासाठी संपादित केली जाते. त्यामुळे होणारे त्यांचे सर्वांगी नुकसान मोजू, मापू, समजू शकेल अशी यंत्रणा, कार्यपद्धती, कर्मचारी शासनाकडे नसतातच. पण

त्याहून महत्त्वाचे, त्याची गरजही जाणवलेली नसते. १८९४ च्या जुनाट भूसंपादन कायद्यानुसार पैसे देऊन विस्थापितांना पळवण्याची सोय असतेच. संपादित मालमत्तेची व्याख्याही सरकारी कागदपत्रांनुसार. कौले बनवणारी माती, गुरे जगवणारा जंगलचारा, गरम कपड्यांची गरज भासू न देणारा लाकूडफाटा, डोंगरातल्या औषधी वनस्पती, उपाशीपोटी कामी येणारी विषारी कंदमुळे, ४०० वर्षांचा महुआच्या झाडाखालचा 'विश्रांती महल' यांची किंमत कोण लावणार? गावे विखुरली गेल्याने नष्ट झालेल्या सामाजिक संस्थांचे मूल्य कसे ठरवणार? (नर्मदा सागरच्या मूल्यांकनामध्ये दोन वर्षांचे कुटुंबाचे उत्पन्न धरून त्याला १.५ ने गुणून किंमत काढली आहे, तसे?) अगदी कायदेशीर मालमत्तेची किंमत लावण्याच्या, उत्पन्नावर आधारित व खरेदीविक्रीवर आधारित अशा दोन्ही पद्धतींतही अपार उणिवा. बरे, पर्यायी साधनांची तरतूद केलीच तरी वस्ती विखुरणार नाही, नाते-बंध कमीत कमी तुटतील अशा खबरदारीसह संपादलेली (पर्यायी) साधनसंपत्तीच विस्थापितांना द्यायला हवी हे तत्त्व मान्य न केलेले. 'देशासाठी त्याग' हा अपरिहार्य भाग असल्याने विस्थापन हा एक विकासासाठी करावा लागणारा सौदाच मानून घ्यावा इतकी उघड बेपर्वाई व्यक्त होणे आता थांबले तरी अजून विकास योजनांच्या लाभात विस्थापितांना हक्क हवा, विकासयोजना या निश्चितपणे 'सार्वजनिक' हित अजमावूनच घेतल्या गेल्याचे विस्थापितांपुढे योजनाकर्त्यांनी सिद्ध करायला हवे, त्यांच्या त्यागावर उभारावयाच्या कार्याच्या आवश्यक त्या सर्व माहितीचा त्यांचा हक्क मानला जावा व पुनर्वसनाचा उद्देश त्यांनाही मूळ जीवनमानाहून विकसित जीवनमानावर नेऊन ठेवणे हाच असावा या मूलभूत गोष्टींना संपूर्ण मान्यता व कृतिरूप देणे झालेले नाही. जिथे काही तरतुदी आहेत तिथे भ्रष्ट, अकार्यक्षम यंत्रणा, पुनर्वसनासारख्या नाजूक प्रक्रियेसाठी आवश्यक वृत्ती, कुशलतेचा अभाव यामुळे प्रत्यक्षात फारच थोडे साधल्याचे दिसते. म्हणूनच तर भाक्राचे कित्येक विस्थापित आजही पुनर्स्थापित झालेले नाहीत. हिमाचल प्रदेशातील पोंग धरणाच्या १६००० कुटुंबांपैकी, एका संशोधनानुसार, सुमारे ९००० च वसवले गेले, तेही असे की ५५०० च प्रत्यक्षात तिथे टिकू शकले. नर्मदेवरच्याच बर्गी धरणाच्या विस्थापितांची पुनर्वसन-आयोजन नसताना उद्ध्वस्त होण्याची कहाणी जबलपूरच्या कमिशनरनी अधिकृत अहवालातच दिली आहे! आंध्र प्रदेशातील श्रीशैलम, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशच्या सीमेवरील सिंगरौली अशा अनेक ठिकाणच्या कहाण्या थोड्याफार फरकाने त्याच! नर्मदेची जोडीदारीण तापीवरील उकाई धरणाने विस्थापित झालेल्यांपैकी जवळजवळ ८० ते ९० टक्के त्याच धरणाच्या लाभक्षेत्रात ज्वारी बाजरीच्या जागी फोफावलेल्या उसाच्या शेतांवर स्थलांतरित मजूर म्हणून अमानवी अवस्थेत वर्षातील ७ महिने राबत असतात!

**अनेक प्रश्न**

सरदार सरोवरासंबंधी पुनर्वसन कार्य, सरकारी घोषणा काहीही असोत, त्याच दिशेने वाटचाल करीत आहे. नर्मदा न्यायाधिकरणाने 'जमिनीला जमीन व कुटुंबाला किमान २ हेक्टर्स जमीन' हे आजवर कुठे न मानले गेलेले (महाराष्ट्राच्या कायद्यातही नाही!) तत्त्व स्वीकारले असले तरी त्यात प्रश्न अनेक:

१. आदिवासी विभागात, दऱ्याखोऱ्यात, रेकॉर्डवर नसलेल्या, अतिक्रमणदार मानल्या गेलेल्या शेतकऱ्यांची संख्या मोठी, त्यांचे काय? भूमिहीनांना जमीन देण्याच्या योजना सरकार आखत/राबवत असताना या विस्थापितांचा हक्क, आदिवासींच्या पूर्वापार साधनांबाबतच्या भारताने मान्य केलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या १०७ व्या ठरावानुसार, तिन्ही राज्यांत मानावा की नाही? मध्य प्रदेशातल्या कहारांच्या मच्छिमारीचे वा मानकरांच्या टरबूज वाड्यांचे, कागदावर नाही म्हणून, अस्तित्व नाकारणार काय?

२. जमीन देताना 'गाव इच्छेनुसार एकत्र वसवावे', 'जमीन लोकांच्या पसंतीची असावी' इ. न्यायाधिकरण निवाडा, जागतिक बँकेबरोबरचा करार यातील निकष पाळून सरकार देऊ शकेल का?

३. पर्यायी जमिनीची किंमत स्वाभाविकच वाढती आहे (गुजरातमधील काही तालुक्यात ती ५०,००० रु. एकरवर गेल्याचे खात्रीचे वृत्त!) ती न्यायाधिकरणाच्या निवाड्याप्रमाणे परत द्यावी लागल्यास विस्थापित कर्जबाजारीच होणार. हे टाळण्यासाठी सरकारकडे फरक देण्याइतका पैसा आहे का? असेल का?

४. आणि सर्वात महत्त्वाचे - जमीन आहे कुठे? वारंवार अर्धेमुर्धे शोध घेऊन धुंडाळलेल्या जमिनी १ लाखाच्या आसपास विस्थापितांना वसवण्याइतक्या नसल्याचे सिद्ध झाले आहे. न्यायाधिकरणाने विस्थापितांची इच्छा असल्यास त्यांना पर्यायी जमीन देण्याची पहिली जबाबदारी टाकली गुजरातवर. गुजरातने न्यायाधिकरणापुढे ३८३२३ हेक्टर्स विविध सदरात मोडणारी (सरकारी पडतर, सिलिंगची, व जंगलजमीन) जमीन उपलब्ध असल्याचे कागदोपत्री दाखविले. प्रत्यक्ष उपयोगात आणावयाची तोवर सारे आकडे बदलले. जंगलजमीन उपलब्ध करू असे जागतिक बँकेचे सहाय्य मंजूर करवण्यापुरते म्हणूनही ती केंद्र सरकार नाकारू लागले. त्यामुळे उपलब्ध जमीन १००८० हेक्टर्स कमी व्हायची, पण गुजरात राज्य खमके! त्यांनी उलट नवी आकडेवारी देऊन सुमारे एक लाख एकर जमीन उपलब्ध दाखविली. (अर्थात प्रकल्पास मंजुरी मिळविण्यासाठी) केंद्रानेही ते गृहीत धरले. राज्य पातळीवर मात्र या आकडेवारीचा तमाशाच चालू राहिला. कराराप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना ही माहिती उपलब्ध करायची होती तर कागदी अहवालात दाखवलेली जमीन त्यावेळी मात्र 'अजून फायनल सर्व्हे बाकी आहे. आजची माहिती भरवशाची नाही' असे केवडिया कॉलनीतले अधिकारीच सांगू लागले. आणि ते खरेच होते. अपेक्षेपेक्षाही अधिक खरे. बडोदा व भडोच दोनच जिल्ह्यांतील विविध प्रकारची जमीन कागदोपत्री गुजरातने महाराष्ट्राला दाखवून देऊ केली. त्याचा जागोजागी जाऊन, दोन्ही राज्यांच्या पुनर्वसन अधिकाऱ्यांनी आढावा घेताच, त्यातील ९०% जमीन कुचकामी वा चुकीच्या रेकॉर्ड मुळे (जसे प्रत्यक्षात आरक्षित जंगल झालेली तर कागदावर सरकारी पडत असे) उपलब्ध नसलेली. म्हणूनच ना गुजरात विस्थापितांसाठीही खाजगी विक्रीची जमीन शोधत दरद्र भटकणे चालू आहे? आणि जमीन लागणार तरी किती? मध्यप्रदेश व महाराष्ट्राचे सरकारी आकडेच अजून पक्के नाहीत. पण गुजरात सरकारच्याच एका जुन्याच अंतर्गत नोंदीनुसारही १८ वर्षाच्या मुलास कुटुंब मानून ५ अेकर जमीन द्यावयाची (जे गुजरात व महाराष्ट्राने मान्य केलेच आहे. मध्य प्रदेश ही करणारच म्हणते.) तर किमान ४३००० हेक्टर्स पर्यायी शेतजमीन जरूरी पडेल. गुजरातच्या उणापुऱ्या १९ गावांतील ३,३०० कुटुंबांना वसवण्यास असमर्थ ठरलेले राज्य तिन्ही राज्यांतील विस्थापित गुजरातेत आल्यास वसवण्याचा दावा कोणत्या आधारावर करू शकते? आजच स्वतःच्या विस्थापितांना स्वतःच खाजगी विक्रीची जमीन शोधण्यासाठी ठाकूर, पाटीदार मोठ्या शेतकऱ्यांपुढे हात जोडण्यास, त्यासाठी स्वखर्चाने धावाधाव करण्यास गुजरातने भाग पाडले आहे. आणि तिथेही जमिनीस जमीन मिळण्याची शक्यता कमीच! मग एकीकडे प्रकल्प पुढे रेटून कालांतराने जमीन नसल्याचे घोषित करून हजारोंना हा प्रकल्प भूमिहीन मजूर बनवणार नाही तर काय?

५. आदिवासी व जंगल यांच्या अपेक्षित आवश्यक नात्याविषयी, 'सामाजिक' वनीकरणाविषयी कितीही योजना/विचार मांडले जावोत, प्रत्यक्षात पुनर्वसनासाठी उजाड वनभूमीची मागणी करून, ''व्यावसायिक पद्धतीने चालणाऱ्या वनविकास महामंडळाऐवजी योग्य तंत्रज्ञानासह वनीकरणासाठी ही जमीन आम्हालाच देऊन पुनर्वसन साधा'' असे सुचवणाऱ्या आदिवासींची मागणी आजवरही मान्य केली गेलेली नाही. पर्यावरण, जंगलसंरक्षण यांविषयी 'मनुष्या'ला बाजूला सारून जंगलसंपत्तीचा फायदा अखेर कुणासाठी—शहरी घरे सजवण्यासाठी की गरिबाची पोळी भाजण्यासाठी—हा प्रश्न न विचारता, हलाखीच्या परिस्थितीतील गरिबांना वाऱ्यावर सोडून ही संपत्ती कुणी वाचवू शकेल का याचाही विचार न करता केंद्रीय पर्यावरण खाते किंवा कित्येक शुद्ध पर्यावरणवादीही याला विरोध करतील. जागतिक बँकेबरोबरच्या करारात जरूर तर वनजमीन पुनर्वसनासाठी उपलब्ध करण्याची भूमिका सरकारने स्पष्ट मान्य केली असतानाही हा विरोध चालू आहे, राहील. तर जमीन पैदा करणार कुठून?

**अद्वितीय तयारी**

प्रश्न फक्त जमिनीचाच नाही! एकूणच पुनर्वसनाबाबत सरकारची तयारी अद्वितीय आहे. न्यायाधिकरण निवाड्यातील काही बाबींचा अर्थ लावण्याचे कामही आजवर पूर्ण झालेले नाही. प्रतिष्ठेचा प्रश्न, दबाव

यामुळे गुजरातने आपल्या विस्थापितांना भूमिहीनांसाठी ५ एकर जमीन, प्रत्येक १८ वर्षावरील व्यक्तीसाठी जमीन, बुडणाऱ्या व पर्यायी जमिनीतील फरकाइतके सरकारी अनुदान इ. गोष्टी जाहीर केल्या आहेत. प्रत्यक्षात स्थानिक अधिकारी ना ठरावातील तरतुदी मान्य करीत आहेत, ना सरकारकडे ते अमलात आणण्यासाठी आवश्यक जमीन व पैसा आहे.

**महाराष्ट्र काय करणार?**

महाराष्ट्र, मध्य प्रदेश सरकारांना सरदार सरोवरची चिंताच कमी! विस्थापितांच्या मागण्यांवर आधारित काही बाबींत केंद्राकडे विचारणा करून गेली दीड-दोन वर्षे त्याचा निर्णय लावून घेण्यात सरकार अयशस्वी. गुजरातेत जाण्यासाठी पराकोटीचे प्रयत्न करून ८३ ते ८५ च्या दरम्यान उठवलेल्या पहिल्याच गावातील ५३ कुटुंबांचे प्रश्नही आंतरराज्य सरकारी कार्यगटाद्वारा सोडवून घेऊ न शकल्याने, महाराष्ट्रातील संघटनेसच अखेर उपवासाचा मार्ग पत्करणे भाग पडले. त्याही अनुभवानंतर, गुजरातेत जाऊ पाहणाऱ्या २५० कुटुंबांनाही गुजरात सरकार योग्य जमीन दाखवू शकत नसताना, प्राधिकरणाकडे अनेक निर्णय साचून असताना, "आमच्या विस्थापितांचा बळी उकाईच्या अनुभवानंतर तरी आम्ही देणार नाही" अशी भूमिका महाराष्ट्र घेऊ इच्छीत नाही. उलट गुजरातचे लोकांना सांगणे आले. की 'उठा उठा' चा आदेश / विनंती! याचवर्षी अगदी पावसाळा दाराशी आला असताना "आत्ताच अुठला नाहीत तर पुढच्या वर्षी स्वतःच्या खर्चाने अुठावे लागेल", "तुमच्या गुरांचे कसे होणार वगैरे आम्हाला विचारू नका, जमिनीचा तुकडा मिळालाय तर उठा" असा काहीसा धाकदपटशा दाखवून जिल्हा-कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी १० घरे उठवली, त्यातील एक-दोघे भरपाई पूर्ण हाती न आलेले. सारेच महिन्याभरातच त्रासलेले. बहुतेक गुरे, बायका-पोरे घेअून अजूनही मूळ गावातच कुणाच्या तरी आसऱ्याने कसेबसे राहिलेले.

अजून 'विस्थापिता'ची / प्रकल्पग्रस्त मालमत्तेची व्याख्या तरी निश्चित आहे का? ज्यांची जमीन/पाडा/गाव व टापू संपर्कहीन बनत असेल त्यांना प्रकल्पग्रस्त मानणार की नाही? ज्याची २५ ते ७५ टक्के जमीन डूबक्षेत्राबाहेर उरत असेल, त्याला १००/ २०० कि. मी. वर पर्यायी जमिनीचा तुकडा देताना, या जमिनीचे काय, असा प्रश्न विचारणार की नाही? काहीच निश्चित नसल्याने, आजवर तरी विस्थापित नेमके किती (आकडा अगोदरच १३५८ वरून १४७६ कुटुंबांवर गेलेला. यात स्वतंत्र कुटुंबे धरली तर तो २००० च्या आसपास किमान जाणारच!), आवश्यक जमीन किती (सरकारचे, नियमन अहवाल काढणाऱ्या संस्थेचे व लोकांच्या संघटनांचे आकडेच वेगवेगळे!) हेही कसे ठाऊक असणार? म्हणून तर प्रत्यक्षात गरज ५००० हेक्टर्सच्या आसपास जाण्याची दाट शक्यता असताना, स्वतःच्या (२५०० हेक्टर्स) अंदाजाइतकीही जमीन शोधण्यास सरकार असमर्थ ठरले आहे. मंत्रालयातून दिल्लीकडे जाणारे अहवाल कितीही आशावादी असोत, प्रत्यक्षात उजाड जमिनीशिवाय पर्याय नाही व तीही पुरी पडेल याची निश्चिती नाही हे जिल्हा पातळीवरील सरकारी कर्मचारीही जाणून आहेत. प्रभावित साधनसंपत्तीच्या नोंदीमधील उणिवा तर विविध खात्यांच्या सरकारी कर्मचाऱ्यांनीच सामाजिक संघटनेच्या मागणीवरून तपासून शोधून काढल्या आहेत. धनखेडी या सुमारे ५० च प्रभावित घरांच्या गावासाठीच केवळ अगोदर जाहीर भरपाईतील उणिवा दूर करण्यासाठी किमान ६ लाख रु. व १८० हेक्टर्स अधिक जमीन (१०,००० रु एकरी किंमत धरली तरी ते १८ लाख!) लागणार असा अहवाल राज्यशासनाकडे सादरही केला गेला आहे. या पैशांची व्यवस्था? कुठल्याच आंतरराज्य यंत्रणेकडून झटपट निर्णय/सहाय्य मिळत नाही. स्वतःहून खंबीर भूमिका घेऊन आयोजनरहित विस्थापन रोखण्याची महाराष्ट्राची धमक/भूमिका नाही. प्रकल्पग्रस्तांच्या संघटनेला पूर्ण सहभागी करून घेणारी सर्व पातळ्यांवर यंत्रणा, पद्धत नाही. अशा अवस्थेतच, केवळ 'पुनर्वसनाचा प्रथम कायदा आमचाच (सरदार सरोवराला लागू न होणारा!)' अशी अधूनमधून बढाई मारत महाराष्ट्र सरकार सुस्तच! हललेच तर प्रकल्पग्रस्तांच्या, जागतिक बँकेच्या, अलीकडे केंद्रीय प्राधिकरणाच्या दबावानेच—असे दुर्दैव!

### मध्य प्रदेश अधिकच मागे!

मध्य प्रदेशची स्थिती याहूनही भयंकर! एकेका गावात १०-१५ जमातींचे लोक आढळणारा तेथील मिश्र विस्थापित समाज! गाववेशीवरच्या हरिजन/मानकर वस्तीतील अर्धशाकारित खोपटात राहून 'दहाडकी'च्या शोधातच आयुष्य घालवणारे, नर्मदेतील माशांवरच अधिक गुजराण करणारे, नर्मदेवरील लिफ्ट इरिगेशनमुळे 'सालदारी'ची गरज भागवणारे, एकेका खात्यावर २५ कुटुंबांची 'टरबूजबाडी' करणारे, भाजीपाला, दुकान, सुतारकाम, वीटभट्ट्या असे अनेक लहानमोठे व्यवसाय करणारे, 'वनग्राम' म्हणून ब्रिटीशांच्या काळी वसवलेल्या ठिकाणी सरकारदरबारी नोंद नसताना राहणारे तिथले हजारो गरीब विस्थापित. तेही आदिवासी, मानकर, कहार, पाटीदार, भारूड, ब्राह्मण, राजपूत अशा अेक ना दोन, अनेक जाती-जमातींत व सुमारे २०० गावांमध्ये विखुरलेले. 'नर्मदामातेला कुणी बांधू शकेल का हो' असा प्रश्नच उराशी घेऊन धाकधूक थोपवून जगत आहेत. 'आपला प्रकल्प' म्हणून राज्याला चिंता नर्मदा सागरची. नर्मदा सागरच्या विस्थापितांसाठी जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांपुढे ठेवण्यासाठी बऱ्यापैकी धोरण घडवले गेले. त्यातही भूमिहीन, स्वयंरोजगारांना काही आश्वासन नाही. 'शक्य तर' च्या पालुपदामुळे 'जमिनीला जमीन' सारखी काही तत्त्वेही अंमलबजावणीच्या अपेक्षेतून सुटलेली. म्हणूनच की काय, सिंचाईक्षम नसेल तर प्रत्येक कुटुंबाला किमान ४ हेक्टरची घोषणा करून ठेवलेली. सरदार सरोवरच्या सुमारे २०० (त्यांचे बदलते आकडे- १८२, २३४, १९३ गावे!) गावांसाठीच जमीन शोधली नसताना नर्मदा सागरच्या २५० गावांसाठी ही अशी घोषणाबाजी. तीही तवा-प्रकल्पग्रस्त वसलेल्या जमिनीच कागदोपत्री नर्मदा सागरग्रस्तांना उपलब्ध असल्याचे दाखवून. ही नीती सरदार सरोवराला लागू करणार करणार म्हणताना आजही लागू न केलेली व केली तरी तेथील अगाध यंत्रणेच्या महतीवरून, आजवरच्या विस्थापितांच्या अनुभवावरून कधीच अंमलात येऊ न शकणारी!

### गुजरातचा 'आदर्श'

भविष्याच्या पोटात विस्थापितांसाठी काय आहे याचा नमुनाच गुजरातने आजवर दाखवला आहे. सरदार सरोवरसाठी सर्वप्रथम उठवले गेले ते गुजरातमधील केवडिया व इतर ५ गावांचे शेतकरी आदिवासी. त्यांची बहुतेक घरे शाबूत ठेवली असली तरी जगण्याचे साधन—शेतजमीन— प्रकल्प कर्मचाऱ्यांसाठी आलिशान अशी केवडिया कॉलनी बांधण्याकरिता १९६०-६१ मध्येच हिसकावून घेतली गेली. त्यावर ९ विविध प्रकारची, दर्जाची विश्रामगृहे, राजीव गांधींना उतरण्यासाठी हेलिपॅड, हजारो फ्लॅटस्, सर्व सोयी उभारण्यात आल्या. वर्षानुवर्षे ती कसणाऱ्यांना काय मिळाले? एकरी ८० ते २५० रुपये व अर्थातच जमीन् संपादित होईपर्यंत, विविध आश्वासने—जमिनीपासून नोकरीपर्यंत साऱ्याचीच! आजही हे लोक भूमिहीन अवस्थेत या कॉलनीच्या दारात पडून आहेत. त्यांच्या शिकलेल्या ५ ते १० टक्के मुलांना नोकऱ्या कशाबशा मिळाल्या—हक्क, प्राधान्य म्हणून नव्हे-त्यांतील बहुतेक गेली ९ ते १०/१२ वर्षे रोजंदारीवरच; मजूर कायदे धाब्यावर बसवून!

गुजरातच्या आठ व महाराष्ट्रातील अर्ध्याच पुनर्वसित गावांचा अनुभव विस्थापितांना जागे करणारा! कुणाच्या नव्याने दिलेल्या जमिनी झाडांचे खुट असल्याने भरमसाट खर्च करावा लागणाऱ्या, कुणाच्या जमिनींवर पूर्वीच्या मालकांच्या कर्जाचा अचानक उघडकीस आलेला हजारोंचा बोजा, कुणाच्या जमिनी पुन्हा कालव्यासाठी संपादन केल्या जाणाऱ्या! कित्येक पुनर्वसित गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठीही कचेऱ्यांच्या वाऱ्यांवर वेळ, पैसा खर्च करावा लागलेला. ''एकदा 'जमिनी' पासून तुटल्यावर कोणीच वाली नाही'' असे उद्गार काढावे लागण्यासारखा मृतवत कचेऱ्याचा कारभार! तिकडे न्यायाधिकरणाने आदिवासींच्या मुलांसाठी बगीचा देण्याचे कागदोपत्री जरी मान्य केले असले तरी, गुरचरणाची, स्मशानाची सोय आवश्यक न मानल्याने, नव्या ठिकाणच्या नव्या शेजाऱ्यांशी झगडून कित्येक आदिवासींनी आपली गुरेढोरे अजून न बुडालेल्या मूळ गावांतच कशीबशी सांभाळून दूरची शेती खडतरपणे चालू ठेवलेली! एक ना अनेक!

## भिवविणारे वास्तव

वास्तव असे भिववणारे, संतापवणारे असताना न्यायाधिकरणाचा निवाडा, जागतिक बँकेशी करार, गुजरातचे ७/८ व महाराष्ट्राचा एकुलता (सतत चुका सुधारित राहणारे) ठराव फडकवत 'नर्मदा प्रकल्पग्रस्तांना न्याय' देण्याच्या घोषणा मात्र भरपूर चालू आहेत. जागतिक बँकेचा १९८५ च्या सुमाराचाच अंदाज २०० कोटींच्या आसपासचा असताना, गुजरातचे मुख्यमंत्री विस्थापितांच्या आंदोलनाला व आंतरराष्ट्रीय दबावाला ५६ कोटी रु. च्या घोषणेने उत्तर देतात व दुसरीकडे खाजगी जमीन पुनर्वसनासाठी विकत घेण्याकरिता जागतिक बँकेपुढे ३ कोटी डॉलर्स रकमेची मागणी करतात! यंत्रणांचा, विस्थापितांच्या सहभागाचा, नियमित मूल्यमापनाच्या व्यवस्थेचा देखावाच अधिक! मध्य प्रदेश वा गुजरातमध्ये विस्थापितांचे प्रतिनिधित्व असणाऱ्या जिल्हा समित्याही कार्यरत नाहींत. महाराष्ट्रात एकुलती जिल्हा समितीही मुख्य निर्णय राज्याकडेच पडून असल्याने बरीचशी कुचकामीच सिद्ध झाली आहे.

पुनर्वसनाच्या मूल्यांकनासाठी प्रत्येक राज्यात स्वतंत्र संस्था नेमली आहे खरी. गुजरातच्या अहवालावर सरकारकडून कार्यवाही तर नाहीच, उलट त्यातील निष्कर्ष बदलण्यासाठी विनंती/दबाव. महाराष्ट्राचा, टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतर्फे आलेला मार्च १९८८ मधील पहिला अहवाल संपूर्णतः निराश करणारा. मूल्यमापन म्हणवता येईल इतपतही विश्लेषण नसलेला. विस्थापितांच्या आदिवासी जमातीपासून त्यांच्या जमिनीच्या किमतीपर्यंत अगदी स्पष्ट अशा बाबींचा/प्रश्नांचा उल्लेखही नसलेला. विस्थापितांचे आजवरच्या पुनर्वसन कार्याचे चित्रच उभे करू न शकणारा. उलट जंगलचाऱ्यावर शेकडो गुरे बाळगणाऱ्या गावांपैकी फक्त एका गावीच (सरकारी दस्तावेजानुसार) २ हेक्टर गुरचरण आहे, अशी वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी माहिती, टीकाटिप्पणीशिवाय देऊन 'कुटुंबवार/गाववार शास्त्रीय सर्वेक्षणा'चा कुचकामीपणाच दाखवून देणारा. संशोधन अहवालात द्यावयाच्या आकडेवारीचा संदर्भ नमूद करावयाचा असतो इतके साधे संशोधनपद्धतीचे तत्त्वही न पाळणारा. कित्येक चुका, उणिवांचा तर खराच, पण विश्लेषण करणाऱ्यांनी, अहवाल लिहिणाऱ्यांनी स्वतः प्रकल्पग्रस्त भागास एकदाही भेट न दिल्याचे सिद्ध करणारा!

मध्यप्रदेशच्या 'नावाजलेल्या' सागर विश्वविद्यालयाने बाहेर काढलेला प्रथम अहवाल तर फाडण्यानेही हात विटाळावेत, असा. संशोधकांच्या सभा, प्रवासाची अनावश्यक वर्णने व आदिवासींचा चोरटा जंगललाकडावरचा धंदा बुडेल म्हणून ते व सामाजिक संस्था धरणाच्या विरोधात आहेत ही अेकमेव खोटी गोष्ट खुलवून सांगणारा. ना माहिती, ना निष्कर्ष, ना तत्त्वे, ना विश्लेषण! पण सरकारला वा जागतिक बँकेला तरी या 'बाहुली' मूल्यांकनयंत्रणेकडून हे सारे हवे आहे कुठे?

जागतिक बँकेचेही पुनर्वसनासंबंधी कितीही सुबक अहवाल निघत असोत, येथले प्रश्न समजण्यातील त्यांच्या मर्यादा, 'परदेशी सल्लागार' हा एकमेव मंत्र बहुधा जपण्याची वृत्ती, प्रकल्पास सहाय्य मंजूर केल्यानंतर कराराच्या अंमलबजावणीत मात्र 'सर्व जबाबदारी तुमच्या सार्वभौम सरकारची' अशी सोयीस्कर भूमिका हेही सारे अगदी थेट वर्ल्ड बँकेचे अध्यक्ष श्री. कॉनेबल यांच्यापर्यंत प्रत्येकाशी झालेल्या चर्चेतून ध्यानी आले आहे. नाही म्हणायला त्यांचा प्रभाव, दबाव चारदोन ठराव सरकारांकडून करवून घेण्यापुरताच!

न्याययंत्रणेचा काही आधार? महाराष्ट्रातील पहिल्या ९ गावांच्या भरपाईसंबंधीच्या केसेस् गेले वर्ष-दोन वर्षे पडून! अक्राणी तालुक्यातील सुरुंग गावच्या भूसंपादन कायदा कलम ४ च्या प्रथम नोटिशीला घेतलेली हरकत प्रथम स्वीकारून वर्षभर भूसंपादन अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी तोंडीच पण तारीख देऊन कायदेशीर चौकशीचे आश्वासन देत देत, अखेर अचानक, तुम्ही कायदेशीर समयमर्यादेनंतर याचिका दाखल केली असे तांत्रिक कारण देऊन ती जिल्हा पातळीवरूनच नाकारली जाण्याचा धक्कादायक अनुभव!

विस्थापितांनी पहायचे तरी कुणाकडे? तालुका ते केंद्र पातळीवर सर्व प्रश्न, पर्यायी आकडेवारी मांडून झाल्यानंतर प्रकल्प मंजुरीच्या वेळी व्यापक बनवलेल्या नर्मदा संचालन प्राधिकरणाकडे विस्थापितांनी धाव घेतली तर तिथेही बरीचशी निराशा. चार महिन्यांच्या वरून दिसणाऱ्या धावपळीनंतरही १४ मे ८८ च्या

विस्थापितांसहच्या चर्चेच्या वेळी प्राधिकरण मागण्यांवर निर्णय घेण्यास, राज्यांचे निर्णय, परिपूर्ण माहिती सादर करवण्यात असमर्थच. प्रयत्न चालू असले तरी तिन्ही राज्यांतील सरदार सरोवरच्याच विस्थापितांना समान तरतुदी वा कुणाच्याही विस्थापनापूर्वीच नव्हे, प्रकल्पाच्या सुरुवातीपूर्वीच सर्वांसाठी द्यावयाची जमीन उपलब्ध आहे का, याचा शोध घेण्याची जरूर हीही प्राधिकरण नाकारू पाहते आहे. एकूण, एवढ्या अवाढव्य प्रकल्पाच्या आयोजन-अंमलाच्या कुशलतेची प्रौढी मिरवणारा (त्यातही व्यवस्थापन-संचालनातील उणिवांबद्दल जागतिक बँकेने नुकत्याच पाठवलेल्या तांत्रिक मूल्यमापन पथकाने स्पष्ट ठपका ठेवला आहे. त्यावरूनच काय ते दिसते!) देश/राज्ये पुनर्वसनाच्या दिशेने समयबद्ध, परिणामकारक प्रगती करण्यातील असमर्थताच दिवसेंदिवस दाखवून देत आहेत.

हा सारा मामला अनुभवातून ध्यानी आल्यानेच विस्थापित संघटित होऊन जाब विचारू लागले आहेत. गुजरातचे आदिवासी गेली ५/७ वर्षे आपल्या समस्या मांडत आहेत. महाराष्ट्रातील गावांनी घरे उठवण्यास, जमिनीशिवाय निव्वळ पैशाची अपुरी भरपाई घेण्यास गेली ३ वर्षे संपूर्ण विरोध केलेला आहे. मध्य प्रदेशचे आजवर विस्कळीत विस्थापितही राजकारण्यांनी विश्वासघात केलेल्या पूर्वीच्या 'निमाड बचाव' च्या जिद्दीनेच पुन्हा जागे झाले आहेत.

त्यांचे प्रश्न निव्वळ भरपूर पैशाचा मोबदला वा चारदोन सुखसोयींसह पुनर्वसन यापुरते मर्यादित नाहीत. अनेक व्यापक प्रश्नांचीच तड आता येथे लावली जाणार आहे. सरदार सरोवरासह देशभरच्या साऱ्याच प्रकल्पांना ते लागू होणारे आहेत. पहिला मुद्दा आहे, हक्काने प्रकल्पाची माहिती मिळवण्याचा. लाभहानीचे नेमके हिशोब, पर्यावरणीय समस्यांसंबंधीचे अभ्यास व योजना यांच्यासह पुनर्वसनाचा संपूर्ण तपशीलवार आराखडा त्यांना हवा आहे. हे सारे पाहूनच, त्याची योग्यायोग्यता, न्याय्यता तपासून त्यांची मंजुरी प्रकल्पाला मिळू शकेल व मगच त्यांच्या मालमत्तेचा 'त्याग' सरकार मागू शकेल अशी भूमिका आहे.

दुसरा मुद्दा आहे, आर्थिक-सामाजिक न्यायाचा.नैसर्गिक साधनांचा विकास हा घटनात्मक बांधिलकीनुसार लाभांमध्ये गरीब-पीडितांनाच सर्वप्रथम प्राधान्य देणारा असायला हवा. सरदार सरोवरच्या लाभक्षेत्रात आज आदिवासींचे बहुमत असलेला तालुका नाही, विस्थापितांत मात्र जवळजवळ १०० टक्के आदिवासी. आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही टक्के (गुजरातमध्ये सुमारे १४ टक्के), राज्याच्या एकूण अर्थयोजनेचा काही भाग हा आदिवासी/विकासासाठी बाजूला काढला जात असताना, १३,५०० कोटींच्या प्रकल्पखर्चाचा भार सोसताना, तिन्ही राज्यांतील प्रकल्पग्रस्तांसाठी एकूण फक्त १ ते २ टक्केच रकमेची तरतूद हा कोणता न्याय? पाणलोट, लाभधारक क्षेत्र, त्यातील सर्व नैसर्गिक साधनसंपत्ती, त्यापासून निर्माण करावयाची संपत्ती (जंगल, जमीन, पाणी, वीज, उद्योग) साऱ्याचा एकत्रित राष्ट्रीय संपत्ती म्हणून विचार करून, पुनर्वाटप करायचेच तर गरिबांनाच सर्वाधिक लाभ मिळेल, विस्थापितांना चालू जीवनमानाहून वरच्या पातळीवर नेऊन ठेवील अशा प्रकारेच केले पाहिजे, अशी ठाम मागणी व संबंधित कृतिरूप मागण्या संघटनांनी शासनापुढे ठेवल्या आहेत.

तिसरा मुद्दा, पुनर्वसनाच्या प्रक्रियेचा. चारदोन गावांच्या 'नमुनेदार पुनर्वसन वसाहती' उभारल्या की इतरांचे काय होते याचा पाठपुरावा करणारा वाली नाही नि विस्थापितांची ताकद नाही अशा भ्रमात सरकारने राहून चालणार नाही. पुनवर्सनासाठी राज्याच्या मर्यादा न पाहता, तिन्ही संबंधित राज्यांतील सर्व विस्थापितांना 'न्याय मिळेल' अशी खात्री शासन देऊ शकत नसेल तर दुष्काळ आहे म्हणून कुणाचे पोट फाडून पाणी काढण्याच्या उपायासारखा या प्रकल्पाचा जालीम इलाज कुणाच्याही कुठल्याही फायद्यांसाठी करू दिला जाणार नाही!

## आजच जागे होणे जरूर

आणि याच मुद्द्यांद्वारा प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टिकोनातून पर्यावरणीय समस्या व उपाय, प्रकल्पाची लाभ-हानी, विस्थापितांचे विकसनशील पुनर्वसन व या साऱ्या निर्णय प्रक्रियेत व अंमलबजावणीत

गावापासून केंद्रापर्यंत (आंतरराज्य प्रकल्पांबाबत) त्यांचा अधिकृत सहभाग व स्थान या साऱ्याविषयी निश्चित भूमिका घेणारे राष्ट्रीय धोरण व पाठोपाठ कायदा अशीच मागणी सरदार सरोवरच्या निमित्ताने पुढे आली आहे.

नेमक्या याच मुद्यांवर सरकारकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने, अन्याय्य वृत्ती-पद्धतींचाच अनुभव आल्याने महाराष्ट्र व म. प्रदेशातील सर्व आणि गुजरातच्या काही प्रकल्पग्रस्तांनी या प्रकल्पास आपला संपूर्ण विरोध करण्याचा निर्णय ३ ऑगस्ट १९८८ रोजी घेतला व १८ ऑगस्ट रोजी सर्व प्रभावित तहसील पातळ्यांवर मोर्चा वां प्रतिनिधी मंडळाने समान निवेदन देऊन जाहीरही केला आहे. पाणी वेढो, गाव बुडो, वा घाव पडो, हा प्रकल्प रोखणारच असा आजचा त्यांचा निर्धार आहे.

सरदार सरोवरच्या १ लाख विस्थापितांमागोमाग एकूणच नर्मदा खोऱ्यातील भयशंकित अशा १० लाख भावी विस्थापितांचा प्रश्न समोर आहेच. पण तो तेवढ्यापुरताही मर्यादित नाही. विकासाची आजची व्याख्या, धोरण, विकासयोजनांचा लाभ कुणाला, बळी कुणाचा; नैसर्गिक संपत्ती वापरात आणताना समतोलच ढासळवणारे योजनांचे स्वरूप व पुढच्या अनेक पिढ्यांना द्यावयाचा वारसा या साऱ्याचाच या निमित्ताने विचार व्हायला हवा आहे. तसा विचार करणाऱ्यांनी, करू पाहणाऱ्यांनी आजच जागे होऊन सर्व ताकदीनिशी सरदार सरोवर बाधितांसह प्रकल्पाच्या विरोधात उभे राहणे जरूरीचे आहे!



## परिशिष्टे :

१) नर्मदा खोरे विकास परियोजना - माहिती

२) केंद्रीय वनखाते व पर्यावरण खाते
यांची सशर्त मंजुरी-पत्रे

३) सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांकडून
पुनर्वसनासंबंधी मागण्यांचे निवेदन

४) सरदार सरोवर प्रकल्पास संपूर्ण
विरोध जाहीर करणारे निवेदन

५) सरदार सरोवर प्रकल्प : घटनाक्रम

# १. नर्मदा खोरे विकास परियोजना - माहिती

## नर्मदा सागर प्रकल्प

१) धरणाचे ठिकाण : पुनासा, जिल्हा खांडवा, मध्य प्रदेश

२) पूर्ण जलाशय पातळी : ८६० फूट

३) पाण्याचा साठा : ७९ लाख एकर फूट

४) गुंतवणूक : रु. ६००० कोटी (१९८७ चा अंदाज)

५) जंगलतोडीने होणारी हानी : रु. ३०,९२३ कोटी (१९८७ चा अंदाज)

६) बुडित क्षेत्र :

अ) क्षेत्रफळ : एकूण ९१,३४८ हेक्टर पैकी ४०,३३२ हेक्टर जंगल व ४४,३६३ हेक्टर शेती योग्य

ब) विस्थापितांची संख्या : १,२९,३९६ (१९८१ च्या गणनेनुसार) पैकी ३०,९४८ आदिवासी

क) गावांचे विवरण : खालीलप्रमाणे

| तालुका | जिल्हा | पूर्ण बुडणाऱ्या गावांची संख्या | अंशतः बुडणाऱ्या गावांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| खांडवा | खांडवा | ६ | १५ | २१ |
| हरसूद | खांडवा | ६२ | ८४ | १४६ |
| कनौद | देवास | २ | १९ | २१ |
| खातेगाव | देवास | ० | १९ | १९ |
| हरदा | होशंगाबाद | १ | ४७ | ४८ |
| **एकूण** | | **७१** | **१८४** | **२५५** |

७) वीज : स्थापित क्षमता १,००० मेगावॉट, फर्म पॉवर २२३.५ मे.वॉ.

८) सिंचन क्षेत्र (लाख हेक्टर) :

| जिल्हा | खरगोन | खांडवा | **एकूण** |
|---|---|---|---|
| क्षेत्रफळ : | १.०४ | ०.१९ | **१.२३** |

## सरदार सरोवर प्रकल्प

नवागाम, जिल्हा भडोच, गुजरात

४५५ फूट

४७ लाख एकर फूट

रु. १३,५०० कोटी (१९८८ चा अंदाज)

रु. ८,१९० कोटी (१९८७ चा अंदाज)

अ) एकूण ३९,१३४ हेक्टर पैकी १३,७४४ हेक्टर जंगल व ११,३१८ हेक्टर शेतीयोग्य

ब) ६६,६७५ पैकी ४८,२५० हरिजन आदिवासी.

क) प्रकल्पग्रस्त गावांपैकी तीन पूर्णपणे बुडतील. बाकी अंशतः.मध्यप्रदेशातील २३४, गुजराथेतील १९ व महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील ३६ गावे विस्थापित होतील. मध्यप्रदेशातील विवरण खालीलप्रमाणे

| तालुका | जिल्हा | पूर्ण बुडणाऱ्या गावांची संख्या | अंशतः बुडणाऱ्या गावांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| अलीराजपूर | झाबुआ | २६ | ० | २६ |
| कुक्षी | धार | ३६ | ० | ३६ |
| मनावर | धार | २३ | १२ | ३५ |
| धरमपुरी | धार | २१ | १२ | ३३ |
| बडवानी | खरगोन | ३४ | ० | ३४ |
| ठीकरी | खरगोन | २७ | १४ | ४१ |
| कसरावद | खरगोन | १५ | ११ | २६ |
| महेश्वर | खरगोन | ० | ३ | ३ |
| **एकूण** | | **१८२** | **५२** | **२३४** |

स्थापित क्षमता : १,४५० मेगावॉट, फर्म पॉवर ३०० मे.वॉ.

| जिल्हा | खेडा | अहमदाबाद | मेहसाणा | सुरेंद्रनगर | भावनगर | राजकोट |
|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्रफळ | १.२३ | ४.१७ | १.९० | ४.२७ | ०.७२ | ०.५० |
| जिल्हा | बनासकांठा | गांधीनगर | पंचमहाल | कच्छ | बडोदा | भडोच |
| क्षेत्रफळ | ३.२० | ०.११ | ०.११ | ०.४३ | ३.३४ | १.२६ |

**एकूण : २१.१४**

## २. केंद्रीय वनखाते व पर्यावरण खाते यांची सशर्त मंजुरी-पत्रे

पत्र १

Government of India, Ministry of Environment & Forests
Telephone No.
Telegram : PARYAVARAN, NEW DELHI
PARYAVARAN BHAVAN, C.G.O. COMPLEX,
LODI ROAD, NEW DELHI - 110 003.

No. 3-87/80-IA June 24, 1987

OFFICE MEMORANDUM

Subject : Approval of Narmada Sagar Project, Madhya Pradesh and Sardar Sarovar Project, Gujarat from environment angle.

1. The Narmada Sagar Project, Madhya Pradesh and Sardar Sarovar Project, Gujarat have been referred to this Department for environmental clearance.

2. On the basis of examination of details on these projects by the Environmental Appraisal Committee for River Valley Projects and discussions with the Central and State authorities the following details were sought from the Project authorities :

i. Rehabilitation Master Plan.
ii. Phased Catchment Area Treatment Scheme.
iii. Compensatory Afforestation Plan.
iv. Command Area Development.
v. Survey of Flora and Fauna.
vi. Carrying capacity of surrounding area.
vii. Seismicity; and
viii. Health Aspects.

3. Field Surveys are yet to be completed. The first set of information has been made available and complete details have been assured to be furnished by 1989.

4. The NCA has been expanded and its terms of reference have been amplified to ensure that environmental safeguard measures are planned and implemented to depth and in its pace of implementation *pari passu* with the progress of work on the project.

5. After taking into account all relevant facts the Narmada Sagar Project, Madhya Pradesh and the Sardar Sarovar Project, Gujarat are hereby accorded environmental clearace subject to the following conditions:

i. The Narmada Control Authority (NCA) will ensure that environmental safeguard measures are planned and implemented *pari passu* with progress of work on projects.

ii. The detailed surveys/studies assured will be carried out as per the schedule proposed and details made available to the Department for assessment.

iii. The Catchment Area Treatment Programme and the Rehabilitation Plans be so drawn as to be completed ahead of reservoir filling.

iv. The Department should be kept informed of progress on various works periodically.

6. Approval under Forest (Conservation) Act, 1980 for diversion of forest land will be obtained separately. No work would be initiated on forest area prior to this approval.

7. Approval from environmental and forestry angles for any other irrigation, power or development projects in the Narmada Basin should be obtained separately.

(S. MAUDGAL)
Director (IA)

The Secretary,
Ministry of Water Resources,
New Delhi.

पत्र २

No. 8-372/83-FC
Government of India
Ministry of Environment & Forests
Paryavaran Bhavan, C.G.O. Complex,
Lodi Road, New Delhi – 110 003.
Dated : 8th September, 1987.

To,

1. The Secretary,
   Agriculture, Forest and
   Cooperative Department,
   Govt. of Gujarat,
   Sachivalaya, Gandhinagar.

2. The Secretary,
   Forest Deptt.,
   Govt. of M.P.,
   Bhopal.

3. The Secretary,
   Revenue & Forest Deptt.,
   Govt. of Maharahstra,
   Mantralaya, Bombay.

Sub : Diversion of 13385.45 ha. (6488.54 ha. in Maharashtra 4165.91 ha. in Gujarat and 2731.00 ha. in Madhya Pradesh) of forest land in Dhule, Bharuch and Khargone district respectively for Sardar Sarovar Project.

Sir,

I am directed to refer to your letter Nos. (1) FLD-1282-78159-V-1 dated 17.2.83 (Gujarat), (2) 5/58/83/10/3 dated 31.8.84 (Madhya Pradesh) and (3) CLD. 1080/111531-II-F3 dated 8.9.83 (Maharashtra) on the above mentioned subject seeking prior approval of the Central Government under Section 2 of the Forest (Cons) Act, 1980 and to say that the proposal has been considered by the Advisory Committee constituted by the Central Government under Section 3 of the Forest (Cons) Act, 1980.

2. After careful consideration of the proposal, the Central Government hereby conveys its approval for diversion of 13385.45 ha. of forest land for Sardar Sarovar Project as per details given below :

| S.No. | State | Forest land to be diverted (ha.) |
|---|---|---|
| 1. | Gujarat | 4165.91 |
| 2. | Madhya Pradesh | 2731.00 |
| 3. | Maharashtra | 6488.54 |

3. This approval is strictly subject to the following conditions :–

i) Legal status of the land will remain unchanged.

ii) The full details of the non-forest lands for raising compensatory afforestation with complete detailes viz. Khasara No. Village etc. will be reported by the State Government before 30.9.87.

iii) The non-forest areas available for rehabilitation of all the oustees will be reported by the State Goovernments or a proposal to the satisfaction of Govt. of India in this regard will be furnished by the State Governments before 30.11.87.

iv) No work on the project in forest area will be commenced until and unless conditions under (ii) and (iii) above are fulfilled.

v) Since the project involves violation and also most of the non-forest areas for compensatory afforestation are away from the project area, the State Govts. will raise compensatory afforestation in double the degraded forest lands also in the project impact ares in addition to the afforestation on equivalent non-forest land. A scheme for this will be submitted by 30.11.87.

vi) The State Governments will prepare by 30.11.87 a plan for the treatment of catchment areas failing which the Central Government will appoint a team for this purpose at the cost of the project for this purpose.

vii) No forest land will be utilised for the rehabilitation of oustees.

viii) Tree felling will be permitted in submergence area only up to 4 M below FRL.

ix) Tree planting will be done on either side of the canals, roads, foreshore of the reservoir and in the wasteland/vacant lands under the control of the Irrigation Department.

x) Water will be supplied free of cost to the Forest Department for raising nursery and for irrigating forestry plantations in the command area.

xi) In order that the construction labour & staff while working on the project in the forest area may not cause destruction to the forest area for meeting their fuelwood needs, the user agency will establish fuelwood depots and will provide suitable alternative domestic fuel such as fuelwood, coal, kerosene oil etc. to them free of cost or at cost deducted from their salary and wages.

Yours faithfully,

(R.S. Bisht)
Under Secretary to the Govt. of India.

# ३. सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांकडून पुनर्वसनासंबंधी मागण्यांचे निवेदन

प्रति
अध्यक्ष,
नर्मदा कंट्रोल अथॉरिटी,
नवी दिल्ली.

विषय : **सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांकडून पुनर्वसनासंबंधी निवेदन**

महाशय,

नर्मदा खोरे विकास योजना ही भारतातीलच नव्हे परंतु विश्वातील भव्य योजनांपैकी अेक आहे. यात ३० मोठे, १३५ (की ४००!) मध्यम व ३००० छोट्या धरणांचा समावेश आहे. यात जलविद्युत प्रकल्पही सामील आहेत. गुजरातमधील नवागामजवळ बांधण्यात येणारा सरदार सरोवर प्रकल्प कालव्यांसह, योजनेची भव्यता व घोषित लाभांचे प्रमाण या दोन्ही दृष्टींनी त्यातील प्रथम क्रमांकाचा प्रकल्प आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश तसेच गुजरात या तिन्ही राज्यांतील अेकूण २८७ * गावांना पूर्णतः वा अशंतः विस्थापित करणारी ही योजना नर्मदाखोऱ्यातील बहुसंख्येने आदिवासी, हरिजन व इतर मागास जाती-जमातींवर आघात केल्याविना अंमलात येवूच शकत नाही. स्वाभाविकतःच, अेकीकडे या योजनेच्या कित्येक वर्षांनंतर प्राप्त होणाऱ्या लाभांचा हिशोब लावला जात असताना, डंका पिटत असताना, दुसरीकडे नर्मदा खोऱ्यातील गरीब जनतेस त्यांची साधनसंपत्तीच नव्हे तर सामाजिक संस्कृतीही बाधित होण्याने जे दुःख, जी चिंता पडली आहे त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जात आहे.

केवळ सरदार सरोवराच्याच नव्हे तर संपूर्ण नर्मदा खोरे विकास योजनेच्याच पर्यावरणावरील संभाव्य परिणामांविषयी आजही स्पष्टता झालेली नाही. कित्येक वर्षे केंद्रीय पर्यावरण विभागाने प्रकल्पास मंजुरी देणे अडवल्याने यावर गंभीर चर्चा झाली व आजही होते आहे. परिणामतः अशा शास्त्रीय बाबींविषयी अंधारातच ठेवले गेलेले प्रकल्पग्रस्त ना आपल्या त्यागाविषयी आश्वस्त आहेत ना पुनर्वसनाबाबत! आजवर भारतभर अंमलात आलेल्या शेकडो प्रकल्पांच्या बाधितांच्या दुर्दशेच्या कहाण्या सर्वज्ञात आहेत. राष्ट्रीय पातळीवर विकास योजनांसंबंधी विस्थापितांना न्याय देणाऱ्या धोरण व कायद्याचा अभाव हेही या प्रश्नाचे अेक महत्त्वाचे, गंभीर अंग आहे. विशेष करून, काही निकषांनी मागासलेल्या परंतु अत्यंत सधन निसर्गसंपत्तीच्या सान्निध्यात जगत आलेल्या आदिवासी समाजास हा प्रश्न सर्वाधिक भेडसावत आहे.

सरदार सरोवराच्या संबंधातील नर्मदा पाणीतंटा न्यायाधिकरण-निवाडा, जागतिक बँकेसह झालेले करार यातील विविध तरतुदी जाणण्याचा प्रकल्पग्रस्तांना हक्क असू नये काय? सरकारी आयोजनांची अद्ययावत स्थिती त्यांनी जाणून घेणे जरूरीचे नव्हे का? प्रकल्पग्रस्तांचा पुनर्वसनाबाबतचा आजवरचा अनुभव त्यांच्यात अनिश्चिततेची जाणीव व विनाशाचे भय उत्पन्न करण्यास कारण ठरला आहे. विस्थापितांच्या संघटनांनी गेली काही वर्षे, विशेषतः गुजरात व महाराष्ट्रात, राज्यपातळींवर केलेले प्रयत्न यशस्वी ठरलेले नाहीत.

याच संदर्भात सरदार सरोवराच्या महाराष्ट्रातील ३३ व मध्यप्रदेशातील २३४ गावांतील प्रकल्पग्रस्तांना आता फक्त केंद्रीय 'नर्मदा कन्ट्रोल अथॉरिटी' च्या कार्यवाहीवरच भरवसा उरला आहे. याच विश्वासाच्या आधारे या दोन्ही राज्यांतील संघटित प्रकल्पग्रस्तांच्या वतीने, ज्यात आदिवासी बहुसंख्येने आहेत, आम्ही खालील मागण्या आपल्या प्राधिकरणापुढे ठेवीत आहोत.

* त्यावेळच्या म. प्रदेश सरकारच्या बाधित गावांच्या संख्येनुसार.

**माहिती मिळवण्याच्या हक्कासंबंधी मागण्या**

१. सर्व प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पासंबंधी तसेच पुनर्वसनाबाबत सम्पूर्ण माहिती मिळावी यासाठी प्रत्येक बाधित गावामध्ये भूसंपादन, पुनर्वसन, सिंचन, महसूल, वनविभाग इ.खात्यांच्या प्रतिनिधींसह (म. प्रदेशात नर्मदा विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत) सभा आयोजित केल्या जाव्यात.

२. पुनर्वसन अधिकाऱ्यांमार्फत केलेले संपूर्ण आयोजन प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी तसेच त्यांच्यामध्ये कार्यरत संस्थांना त्वरित देण्यात यावे. असे आयोजन आजवर पूर्ण झालेले नसल्यास आयोजनामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या प्रातिनिधिक संघटनांस (जसे महाराष्ट्रात नर्मदा धरणग्रस्त समिती व म. प्रदेशात नर्मदा घाटी नवनिर्माण समिती) सहभागी करावे. अशा आयोजनामध्ये पुढील किमान बाबींचा समावेश असावा.

(अ) बाधित क्षेत्राचे नकाशे, तसेच प्रकल्पग्रस्त कुटुंबांची, त्यांच्या स्थावर-जंगम मालमत्तेसह यादी.

(ब) पुनर्वसनाकरिता शासनांनी निवडलेल्या पर्यायी जमिनींचे तपशील, नकाशे व भौगोलिक सुखसोयींचे आराखडे.

(क) गावानुसार विस्थापनाचे (गाव बुडण्याचे व पुनर्वसनाचे) वेळापत्रक.

(ड) प्रत्येक प्रकल्पग्रस्त कुटुंबास देण्यात येणाऱ्या वाहतूक सवलती. त्यासाठी सोय (रस्ते इ.) व आर्थिक तरतूद याविषयी माहिती.

(इ) जमीन, बाधित अुद्योग, स्थावर-जंगम मालमत्ता इ. ची भरपाई निश्चित करण्याचे निकष, पद्धती व संबंधित शासकीय निर्णय / ठराव.

(ई) भूसंपादन तसेच पुनर्वसनासंबंधी ब्लॉक, तालुका, जिल्हा, राज्य तसेच केन्द्र पातळीवरील सरकारी, निमसरकारी, गैरसरकारी विभाग / संस्था / यंत्रणा, त्यांची कार्यक्षेत्रे, अधिकार, अंर्तसंबंध इ.

३. सरदार सरोवर तसेच नर्मदा खोरे योजनेसंबंधी केले गेलेले, चालू असलेले, करण्यात यावयाचे अभ्यास / संशोधने व त्यांचे अहवाल, त्यासंबंधी टिप्पण्या इ. माहिती प्रकल्पग्रस्तांना देण्यात यावी.

४. सरदार सरोवर तसेच संबंधित नर्मदा सागरसाठी विविध स्तरोतांकडून करण्यात आलेली आर्थिक तरतूद व संबंधित ठराव, करार, कायदे इत्यादीची माहिती प्रकल्पग्रस्तांपुढे ठेवण्यात यावी.

**पर्यायी जमिनीविषयी मागण्या :-**

५. नर्मदा पाणीतंटा न्यायाधिकरण निवाड्यानुसार प्रत्येक खातेदार परिवारातील १८ वर्षावरील पुरूषास स्वतंत्र कुटुंब मानून त्यास किमान ५ एकर वा कमाल जमीनधारणेपर्यंत (त्याच्या खात्यावरील जमिनीइतकी) पर्यायी जमीन देण्यात यावी. पुनर्वसनाच्या वेळेस १८ वर्षे वय असणाऱ्या प्रत्येकास हा फायदा मिळावा. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित स्त्रियांनाही स्वतंत्र कुटुंब मानून हा फायदा द्यावा.

६. सरकारी पडतर जमीन, जंगल जमीन तसेच नदीनाल्यांकाठची जमीन कसणाऱ्यांचे / त्यांच्या जमिनींचे विशेष सर्वेक्षण केले जावे व या सर्वेक्षणाच्या आधारेच कसणाऱ्या कुटुंबास किमान ५ अेकर पर्यायी जमीन उपलब्ध करण्यात यावी.

७. केवळ शेती वा शेतीसंबंधी अुद्योग करणाऱ्या सर्व भूमिहीन शेतमजूर, भागीदार, गोवाल इ. च्या कुटुंबांनाही (प्रत्येक १८ वर्षावरील मुलाचे स्वतंत्र कुटुंब मानून) प्रत्येकी ५ अेकर जमीन अुपलब्ध करण्यात यावी.

८. शेतीसाठी देण्यात यावयाची पर्यायी जमीन, नांगरण्यासाठी तयार, सिंचित वा सिंचाई होण्याजोगी असावी. सिंचाई होण्यायोग्य जमिनीत सिंचाईव्यवस्था कुठल्या प्रकारची होवू शकते हे निश्चित करून

तशी करण्यासाठी कालमर्यादा ठरवली जावी. अुदा. विहीर - अेक वर्ष, तलाव - दोन वर्ष (पुनर्वसन झाल्यापासून) इ.

९. न्यायाधिकरण निवाड्यातील तरतुदींनुसार प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन त्यांच्या इच्छेनुसार गुजरातेत वा त्यांच्या स्वतःच्या राज्यात केले जावे. पुनर्वसन व्यवस्था प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक, संबंध-क्षेत्रातच व्हावी.

१०. प्रत्येक गावास अेक स्वतंत्र युनिट मानून अेकाच स्थानी अेकत्रित पुनर्वसित करण्यात यावे; तसेच किमान ५ गावांचे जोडीने पुनर्वसन व्हावे.

११. पर्यायी जमिनीची प्रत कृषितज्ञ, संबंधित पुनर्वसन अधिकारी, तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी यांनी मिळून निश्चित करावी. वरील मागण्यांमध्ये अनुस्यूत कसोट्यांना अुतरलेल्या जमिनीचे अभिलेख, नकाशे, व इतर सर्व माहिती प्रकल्पग्रस्तांपुढे सहमतीकरिता ठेवली जावी व त्यांच्या स्वीकृतीसाठी त्यांना सरकारी खर्चाने ती दाखवण्यात यावी.

१२. सरदार सरोवरामुळे अधिकतम जलस्तरा (MWL) च्या वरच्या बाजूची किती जमीन ओल, भूमिक्षय अथवा बॅकवॉटरने प्रभावित होण्याची शक्यता आहे याचे अध्ययन करविले जाअून अशा जमिनीवरील सर्व परिवारांनाही प्रकल्पग्रस्त मानले जावे.

१३. सरदार सरोवरामुळे टापू बनणारी वा भोवतालापासून दळणवळणाच्या गैरसोयीमुळे तुटणारी घरे, जमिनी, वाडे वा गावेही प्रकल्पग्रस्त मानून संपादित केली जावीत व त्यातील लोकांचे यथायोग्य पुनर्वसन व्हावे.

१४. प्रकल्पग्रस्त क्षेत्रातील ज्या गावांचे भू अभिलेख बाकी आहेत वा ज्या 'जंगल गावांचे' सर्वेक्षण झालेले नाही त्यांचे विशेष सर्वेक्षण तातडीने केले जाअून त्यांना मालमत्तेची मालकी देवून प्रकल्पग्रस्तांमध्ये सामील करावे.

१५. प्रत्येक परिवाराच्या मालकीच्या / कसण्याच्या संपूर्ण जमिनीचा कितवा हिस्सा डूबक्षेत्रात येतो याचा आढावा घेअून न्यायाधिकरणाच्या निवाड्यानुसार पर्यायी जमिनीचे प्रमाण निश्चित व्हावे. अेकत्रित जमिनीचा हिस्सा यासाठी प्रमाण धरू नये.

१६. सरदार सरोवर प्रकल्पग्रस्त आदिवासी गावांच्या पुनर्वसनासाठी वरील सर्व निकषांनुसार इतर पर्यायी जमीन अुपलब्ध नसल्यास अुजाड जंगलजमीन, जरूर तर अंशतः वनीकरणाच्या अटीसह, जागतिक बँकेबरोबर झालेल्या करारानुसार अुपलब्ध करण्यात यावी.

१७. सरदार सरोवर प्रकल्पग्रस्त लहान वा मोठ्या शहरांच्या पुनर्वसनाची व्यवस्था योजनाबद्ध रीतीने मूळ स्थानाच्या जवळपासच करण्यात यावी.

**न बुडणाऱ्या पण बाधित क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंबंधी.**

१८. केवडिया, कोठी, नवागाम, वाघडिया व लिमडी या गुजरातेतील सहा गावांतील ज्या कुटुंबांची जमीन सुमारे २५ वर्षांपूर्वी केवडिया कॉलनी परिसर वा इतर बांधकामाकरिता संपादित केली होती त्या सर्वांना तात्काळ प्रकल्पग्रस्त घोषित करून निवाडा तसेच सर्व ठराव-करारांनुसार त्यांचे पुनर्वसन केले जावे. यापुढेही अशा प्रकारच्या प्रभावितांचे, कालव्यांमुळे प्रभावित होणाऱ्यांचे असेच पुनर्वसन व्हावे.

**भूसंपादनाविषयी मागण्या**

१९. ज्या खातेदारांच्या पूर्ण जमिनीचा काही भाग बाधित होत असेल व अुरलेला भाग ५ अेकरहून कमी असेल त्यांची इच्छा असल्यास सर्वच जमीन संपादित केली जाअून वरील मागण्यांनुसार पर्यायी जमीन देवून त्यांचे पुनर्वसन व्हावे. बाकी जमीन ५ अेकरहून अधिक असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या इच्छेनुसार त्यांचे नव्या जागी पुनर्वसन व्हावे किंवा संपादित हिश्श्याची भरपाईच फक्त दिली जावी.

२०. अेखाद्या पाड्याचा वा गावाचा ७५% भाग (शेतीचे क्षेत्र वा घरांची संख्या) बाधित होत असल्यास त्या गावाचे वा पाड्याचे संपूर्ण क्षेत्र / घरे संपादित करण्यात येअून पुनर्वसन केले जावे. आदिवासी, हरिजन तसेच इतर मागास जाती-जमातींकरिता या टक्केवारीत काही लवचिकपणा (बदलाची शक्यता) असावा.

२१. पुनर्वसनाच्या संपूर्ण आराखड्यास प्रकल्पग्रस्तांची मंजुरी मिळाल्यावरच भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात यावी.

२२. भूसंपादन कायद्याच्या कलम ४ नुसार सुरू होणारी प्रक्रिया प्रत्यक्ष पुनर्वसनापर्यंत तीन वर्षांच्या आत पूर्ण करण्यात यावी.

२३. भूसंपादन कायद्याच्या कलम ४, ९ (१,२) ९ (३,४) व १२ (२) च्या नोटिसा सर्व राज्यांमध्ये व्यक्तिशः (कुटुंबवार) बजावल्या जाव्यात व त्यांस हरकत घेण्याची कालमर्यादा नोटीस प्रत्यक्षात हाती पडण्याच्या तारखेपासूनच गणण्यात यावी.

२४. भूसंपादन कायद्याच्या ११ व्या कलमांतर्गत जाहीर होणारा भरपाई-अॅवॉर्ड अेका गावच्या सर्व प्रकल्पग्रस्तांच्या सर्व मालमत्तेसाठी अेकत्र व अेकदाच जाहीर केला जावा.

२५. प्रत्येक प्रकल्पग्रस्त परिवाराकडे प्रभावित व्यक्तींच्या मालमत्तेच्या, बाधिताच्या तसेच हक्काची (लागू होणारी) पर्यायी जमीन व सोयींच्या तपशिलांसह अेक ओळखपत्र ठेवण्यात यावे.

**भरपाईसंबंधी मागण्या.**

२६. सरदार सरोवरग्रस्तांपैकी ज्यांचा (शेती व्यतिरिक्तचा कुठलाही) अुद्योग विस्थापित होणार असेल त्यांना संभाव्य नुकसान-भरपाई म्हणून किमान अेका वर्षाच्या अुत्पन्नाइतकी भरपाई दिली जावी व त्यांना नवीन ठिकाणी सरकारी योजनांतर्गत कर्जे / मदत देण्यासाठी प्राधान्य दिले जावे.

२७. सरदार सरोवरग्रस्तांतील मच्छिमारी व्यवसायातील कुटुंबास सरोवरात मत्स्यव्यवसायासाठी हक्क दिले जावेत व कोणत्याही संबंधित योजनेमध्ये प्राधान्याने लाभ मिळावेत.

२८. भूसंपादन कायदा वा भरपाई ठरवण्याच्या पद्धतीने बाधित अेक अेकर जमिनीची भरपाई ही पर्यायी अेक अेकर जमिनीच्या किंमतीहून कमी असेल तर तो फरक सरकारकडून दिला जाण्याचा विशेष ठराव सर्व राज्यांतील प्रकल्पग्रस्तांसाठी व्हावा.

२९. प्रकल्पबाधित घरांच्या वाहतुकीचा तसेच पुनर्स्थापनाचा (घर मोडणे, अुतरवणे, पुन्हा बांधणे इ. ची मजुरी धरून) सर्व खर्च सरकारकडून केला जावा.

३०. प्रकल्पबाधित घरांची भरपाई घसारा न कापता ठरवली जावी. भरपाई निश्चित करण्याचा आधार पुनर्वसित क्षेत्रात चालू घरासारखेच घर अुभे करण्यास लागणारा खर्च (सरकारी बांधकाम विभागाच्या नियमांनुसार) हा असावा.

३१. प्रकल्पग्रस्तांच्या मालकीच्या झाडांची भरपाई केन्द्रीय जंगल व पर्यावरण खात्याने निश्चित केलेल्या कसोट्यांनुसार ठरवली जावी.

३२. प्रकल्पग्रस्त गावांच्या अुपयोगात असलेल्या सार्वजनिक नैसर्गिक साधनांपासून ती गावे तुटणार असल्याने त्या साधनांना पर्याय देण्याचे निश्चित आयोजन पुनर्वसनाच्या आराखड्यात असावे. जसे जंगल साधनांवर (जळण, लाकूड, चारा इ.) जगणाऱ्यांना पर्यायी जागेत गुरचरण, लाकडाची व्यवस्था इ. वा त्यासाठीच जंगलाच्या सान्निध्यातील जागा द्यावी.

**रोजगारासंबंधी मागण्या**

३३. सरदार सरोवर प्रकल्पग्रस्त क्षेत्राच्या व पुनर्वसित क्षेत्राच्या आसपासच्या सर्व सरकारी तसेच बिनसरकारी अुद्योगांमध्ये प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य दिले जावे.

३४. विस्थापन व पुनर्वसन यामधील अंतरिम कालावधी म्हणून किमान दोन वर्षांपर्यंत वा जमीन शेतीयोग्य होईपर्यंत (जो कमी असेल तो) रोजगाराची हमी दिली जावी. सरकारतर्फे रोजगार अुपलब्ध न होअू शकल्यास दर दिवशी १५ रु. दराने बेरोजगार भत्ता दिला जावा.

**भौगोलिक सोयीसंबंधी मागण्या**

३५. नर्मदा पाणीतंटा निवाड्यामध्ये तरतूद असलेल्या सोयींव्यतिरिक्त पुनर्वसित गावांसाठी अेकूण (पर्यायी) शेतजमीनीच्या १०% जमीन गुरचरण म्हणून अुपलब्ध व्हावी.

३६. गाव गाव स्वतंत्र वसवले गेल्यास व गावातील कुटुंबसंख्या सोयींच्या प्रमाणासाठी निवाड्यात नमूद केलेल्या संख्येपेक्षा (जसे, ५० घरांना १ विहीर) कमी असेल तरी खालील किमान सोयी प्रत्येक पुनर्वसित वस्तीमध्ये करण्यात याव्यात :

(अ) प्राथमिक शाळा

(ब) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

(क) गुरांसाठी पाणी व्यवस्था

(ड) वस्तीपर्यंत पक्के रस्ते

(ह) गावाच्या मध्यभागी सार्वजनिक चौथरा

(ई) गुरचरण

(उ) धर्मस्थान

३७. कुठल्याही बाधित गावास विस्थापित करण्यापूर्वी पर्यायी ठिकाणी सर्व मान्य सोयी चालू होण्याच्या स्थितीत तयार असल्याची खात्री करून घेतली जावी.

**मूल्यमापन व संचालन प्रक्रियेसंबंधी मागण्या**

३८. प्रत्येक बाधित राज्यामध्ये मूल्यमापन व संचालन कार्यासाठी नेमलेल्या संस्थेच्या कार्यामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिनिधींचा अधिकृत सहभाग घेतला जावा.

३९. भूसंपादन प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी या संस्थांद्वारा प्रकल्पग्रस्तांचे आजचे जीवनमान, जीवन पद्धती तसेच खाजगी व सार्वजनिक साधनसंपत्तीचे संपूर्ण अध्ययन झाले पाहिजे.

४०. या संस्थांमार्फत केलेल्या अध्ययन / सर्वेक्षणावरून बाधित गावांच्या / कुटुंबाच्या स्थावर-जंगम सम्पत्तीची माहिती निश्चित करून सरकारी माहिती त्यानुसार सुधारून घेतली जावी.

४१. प्रत्येक राज्याचा मूल्यमापन व संचालनाचा सहामाही अहवाल सार्वजनिक अुपयोगासाठी प्रकाशित केला जावा. निदान प्रकल्पग्रस्तांच्या प्रातिनिधिक संस्थेस दिला जावा.

**नर्मदा संचालन प्राधिकरणाकडून अपेक्षा.**

४२. भारत सरकारतर्फे खास नियुक्त केलेल्या केंद्रीय नर्मदा संचालन प्राधिकरणाद्वारा (नर्मदा कंट्रोल अथॉरिटी) खालील बाबतीत त्वरित कार्यवाही केली जावी.

(अ) न्यायाधिकरण निवाड्यातील विवाद्य वा अस्पष्ट मुद्यांवर खुलासा करणे.

(ब) निवाड्यातील, करारातील वा नंतर केलेल्या तरतुदींबाबत आंतरराज्य फरक वा विसंगती असल्यास ती दूर करून तिन्ही राज्यांतील विस्थापितांसाठी अेक समान धोरण व कार्यपद्धती निश्चित करणे.

(क) पुनर्वसनाची योजना प्रत्यक्ष अंमलात आणण्याच्या दृष्टीने लोकांच्या सहभागासाठी केंद्र, राज्य तसेच त्याखालील पातळ्यांवर विविध समित्या स्थापन करणे व त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिनिधींची सक्रीय भागीदारी घेणे.

४३. प्रकल्पग्रस्तांच्या वरील सर्व मागण्यांवर निर्णय घेणे व अंमलात आणण्यासाठी आवश्यक ते करणे.

आम्ही 'विकसनशील पुनर्वसना'वर विश्वास असणारे, नर्मदा खोऱ्यातील संघटित प्रकल्पग्रस्त अपेक्षा करीत आहोत की आमच्या वरील सर्व मागण्यांवर आपण सविस्तर विचारविमर्श कराल.

आम्ही हेही अपेक्षितो की यांतील प्रत्येक मागणीच्या पूर्ततेचे आश्वासन जरूर तर संपूर्ण चर्चेनंतर, आम्हास लेखी स्वरूपात विनाविलंब दिले जाईल. आजवर कोणत्या ना कोणत्या माध्यमातून सर्व शासकीय पातळ्यांवर आम्ही यातील बहुतेक मागण्या ठेवलेल्या आहेतच. त्यांच्या पूर्ततेचीही आशा धरली आहे. आता, प्रकल्पास केंद्रीय मंजुरी मिळाल्यावर, पुनर्वसनाचा आराखडा वा व्यवस्था न करताच धरणाचे काम मात्र जोमाने चालू केले गेले आहे. म्हणूनच जोवर पुनर्वसनाची संपूर्ण योजना नर्मदा खोऱ्यातील प्रकल्पग्रस्तांपुढे ठेवली जात नाही, तोपर्यंत प्रकल्पाशी संबंधित सर्व कार्य ताबडतोब स्थगित करण्यात यावे. अखेरीस आमच्या मागण्यांवर १५ डिसेंबर १९८८ पर्यंत स्पष्ट, निश्चित व अंतिम निर्णय देण्यात यावा, अशी आम्ही या निवेदनाद्वारे मागणी करीत आहोत. तसा अपेक्षित निर्णय या कालमर्यादित न मिळाल्यास अधिक तीव्र आंदोलनाचा आमचा निश्चयही आम्ही येथे जाहीर करीत आहोत.

आपले,

प्रतिनिधी,

नर्मदा घाटी नवनिर्माण समिति,
टवळाई, मनावर, धार,
मध्यप्रदेश.

नर्मदा धरणग्रस्त समिती,
धुळे, महाराष्ट्र.

# ४. सरदार सरोवर प्रकल्पास संपूर्ण विरोध जाहीर करणारे निवेदन

**म**हाशय,

नर्मदा नदीवर बांधल्या जाणाऱ्या सरदार सरोवर प्रकल्पामुळे होणाऱ्या विनाशाविषयी आपणास माहिती असेलच! ३१,७०० हेक्टरहून अधिक वनजमीन तसेच १२,००० हेक्टर शेतजमीन यामध्ये बुडणार आहेच, परंतु एकूण २३५ हून अधिक गावांतील एक लाखाहून अधिक लोकांचे विस्थापन हा सुद्धा या प्रकल्पाचा एक अपरिहार्य परिणामच मानला गेला आहे.

मध्यप्रदेश, महाराष्ट्र तसेच गुजरातच्या विस्थापितांनी या योजनेच्या लाभ-हानीचे सरकारी हिशोब, पुनर्वसनाविषयी उदार धोरणाचे आश्वासन, पर्यायी जमिनीची उपलब्धता इत्यादीविषयी विचारविनिमय करून सरकारकडून पुनर्वसनाची संपूर्ण योजना विस्थापितांसमोर ठेवण्याची अपेक्षा केली होती. नर्मदा पाणीतंटा निवाड्यातील पुनर्वसनाच्या तरतुदी, विश्वबँकेसह झालेल्या करारातील मान्य तत्त्वे, सरकारतर्फे आजपर्यंत जाहीर झालेले ठराव इत्यादींची माहिती तसेच प्रकल्पग्रस्त क्षेत्रातील स्थितीचा अभ्यास तसेच अनुभव यांच्या आधारे विस्थापितांच्या संघटनांनी राज्य तथा केंद्र शासनाच्या पातळीवर काही वर्षांपासून आपल्या मागण्या व सूचना ठेवल्या होत्या. अपेक्षा हीच होती की देशभरच्या धरणग्रस्तांची आजवर झालेली दुर्दशा लक्षात घेऊन सरदार सरोवरसारख्या विशेष प्रकल्पासंबंधी तरी सरकार काही वेगळा प्रतिसाद देईल. पुनर्वसनाचे तिन्ही राज्यांकरता समान धोरण, आवश्यक शासन यंत्रणा व जमीन तसेच इतर साधने समयबद्ध कार्यक्रमानुसार एकत्रित करून विस्थापितांच्या सहकार्याने सरकार त्याची पूर्ण अंमलबजावणी करेल हीच अशा सर्वांना वाटत होती.

राज्य तथा केंद्र शासनाच्या सर्व संबंधित खात्यातील सर्व अधिकाऱ्यांशी याच मुद्यांवर वर्षानुवर्षे चर्चा होत राहिली. काही आश्वासने निश्चितच मिळाली. परंतु तरीही मागण्यांवर निर्णयात्मक उत्तर मात्र मिळाले नाही. ३० जानेवारी १९८८ या दिवशी धरणस्थळी झालेल्या हजारो विस्थापितांच्या भव्य सभेने केंद्रीय नर्मदा कंट्रोल ऑथॉरिटीला पुन्हा एकदा निर्णय घेण्याचे आवाहन केले, त्याचाच परिणाम म्हणून ऑथॉरिटी तसेच तिन्ही राज्यांच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसह १४ मे १९८८ रोजी मागण्यांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. परंतु चर्चेतून हेच सिद्ध झाले की राज्यशासनाकडे सरदार सरोवर विस्थापितांसाठी ना पुनर्वसनाचे धोरण तयार आहे, ना आवश्यक साधने! 'जमीन कुठे' हा प्रश्न आजही अनुत्तरितच राहिला आहे.

विस्थापितांमध्ये कार्यरत अशा स्वयंसेवी संघटनांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्राच्या ३३ प्रकल्पग्रस्त गावांसाठी १२००० एकरहून अधिक जमिनीची आवश्यकता आहे. सरकार मात्र ३०० एकरहून जराही अधिक जमीन शोधू शकलेले नाही. मध्यप्रदेशातील १८९ गावांसाठी तसेच बॅक वॉटरने प्रभावित गावठाणे पुनर्वसित करण्यासाठीही आवश्यक जमीन सुद्धा नसल्याचे चित्र दिसून आले आहे. जागतिक बँकेच्याच पत्रव्यवहारात ही गोष्ट मान्य करण्यात आली आहे. गुजरातमधील गावांसाठी शोधली जाणारी विखुरलेली जमीन घेऊन आजपर्यंत उठवलेल्या ८ गावांची विखरुन वाताहात लागली आहे. तेथील पर्यायी जमिनीची किंमत ५०,०००/- रु. एकरपर्यंत वाढली आहे. यासाठी विश्वबँकेकडे गुजरातने मागितलेली ४५ कोटी रु. ची मदत मंजूर होण्याचे चिन्ह दिसत नाही. कुठे आहे जमीन नि कुठे आहे पैसा ?

आजवर याच धरणांसाठी विस्थापित झालेल्या गावांची 'अवस्था' केवडिया कॉलनी तसेच धरणाच्या

सुरवातीच्या बांधकामासाठी उठवलेल्या गावांच्या स्थितीवरूनच स्पष्ट होते. केवडिया कोठी, वाघडिया इ. सहा गावातील सुमारे ७०० कुटुंबांची जमीन १६०-६१ मध्येच ८० ते २५० रु. एकर भावाने संपादित केली गेली. परंतु आजवर त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित न केल्याने भूमिहीन अवस्थेत पडून रहावे लागले आहे. इतर अर्धीमुर्धी विस्थापित झालेली गावे चारा, पाणी इ. अडचणी, सरकारने खरेदी करून दिलेल्या जमिनीवरील मूळ खातेदारांच्या हजारो रु. च्या कर्जाचा छुपा भार इ. मुळे हैराण अवस्थेतच आहेत. आजवरची ही कहाणी आमच्या सर्वांच्या डोळ्यासमोर आहेच. केवळ पुनर्वसनाचीच नव्हे तर या योजनेच्या पर्यावरणावरील परिणामाविषयीची स्थितीही अशीच आहे. या विशाल प्रकल्पाचे वर्णन 'विकास योजना' म्हणून केले जात असले तरी त्याविषयीचा निर्णय पूर्वग्रहदूषितच दिसून आलेला आहे. या लाभ-हानीचा हिशोब कागदोपत्री मांडलेला असला तरी तो पूर्ण माहिती व संशोधनाशिवायच! सरकारी कागदपत्रांवरुनही दिसून येते की आजवर राज्यांमार्फत कित्येक महत्त्वपूर्ण अभ्यास व आयोजन करावयाचे बाकी आहे; यात समावेश होतो पाणलोट क्षेत्र-विकास, लाभधारक क्षेत्रविकास, आरोग्यावर परिणाम, भूकंपशास्त्रीय अध्ययन तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसन योजना यांचा. प्रकल्पाची किंमत ४००० कोटीवरुन १३,५०० कोटींवर गेल्यावरही लाभहानीच्या आकड्यांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा विचार केला गेलेला नाही. न बुडणाऱ्या जंगलाची योग्य किंमत लावली गेली आहे; न बाधित व पर्यायी शेतजमिनीची.

याउलट, लाभाचे मात्र अवास्तव चित्र उभे केले गेले आहे. उदाहरणार्थ २५ वर्षांपर्यंत वाढतच जाणारे पिकांचे प्रमाण. सिंचाईमुळे अगोदरच सिंचित जमिनीतील पिकांमध्येही दुप्पट-तिपटीने वाढ, अशी काही फसवी गृहिते समजून उमजून धरली गेली आहेत. आणि तेही अंदाजे मांडलेल्या सुरवातीच्या प्रमाणापेक्षा (२८ दशलक्ष एकर फूट वास्तव) मोजणीतून सिद्ध झालेली नर्मदेतील पाण्याची उपलब्धता १५% ने कमी झाली आहे, व त्याचप्रमाणात लाभांचे गणितही बदलणार आहे, हे माहीत असूनही आमच्या त्यागावर, अशा अवास्तव गृहितांवर व अर्धवट आयोजनासह उभ्या रहाणाऱ्या या प्रकल्पास 'सार्वजनिक हिताचा' प्रकल्प मानायचे तरी कसे ? तरीही सरकारचे जर हे मानणे असेल तर आमची मागणी होती, आमचा हट्ट होता की त्यांना संपूर्ण माहिती देऊन आमच्यापुढे हे शक्य करून दाखवावे! तेही केले गेलेले नाही. उलट विविध संस्थांतर्फे केले गेलेले अभ्यास, त्यांचे अहवाल, जागतिक बँकेसह झालेले करार इ. महत्त्वाची माहिती 'गुप्ततेच्या' नावाखाली दडपून ठेवली गेली आहे. हा आमच्या त्यागाचाच नव्हे तर लोकशाही प्रक्रियेचाच उपहास आहे!

याच संदर्भात नर्मदा कंट्रोल ॲथॉरिटीकडे निवेदन केले होते की जुलै अखेरपर्यंत त्यांनी राज्यशासनांच्या सहकार्याने प्रकल्पाविषयीची पूर्ण माहिती तसेच पुनर्वसनाचा संपूर्ण तपशीलवार आराखडा आमच्या संघटनांपुढे ठेवावा! समयमर्यादा उलटून गेली तरी त्यांच्याकडून न उत्तर आले न पुन्हा चर्चा विचार करण्याची तयारी दाखविली गेली! तिन्ही राज्यांना समान असे पुनर्वसनाचे धोरणही जाहीर झाले नाही! घटनात्मक संरक्षण मिळालेल्या हजारो आदिवासींसह साऱ्या गरीब सत्ताहीन विस्थापितांना समाधानकारक पुनर्वसनाशिवायच उठण्यास भाग पाडता येईल असाच सरकारचा अंदाज होता की काय?

आता वेळ निघून गेली आहे. कित्येक वर्षांचे प्रयत्न, चर्चा-विचार, अनुभव घेतल्यानंतर आम्ही याच निष्कर्षावर आलो आहोत की १३,५०० कोटी रु. चा सरदार सरोवर प्रकल्प देशाचा विकास न साधता उलट आंतरराष्ट्रीय धनिक संस्थांकडे या देशाला गहाण टाकण्यासच कारणीभूत ठरेल! कोट्यावधी रुपयांचा हा तमाशा गरीबांना काही लाभ तर देणार नाहीच परंतु शहरांच्या भोगवादी वृत्तीसच वीज व नगदी पिकांच्या रूपाने बळकटी आणेल! त्याचप्रमाणे नैसर्गिक साधनसंपत्तीवर जगणाऱ्या आमच्यासारख्या हजारोंना उध्वस्त करेल.

या प्रकल्पावर काही कोटी (त्यापैकी ७५% व्यवस्थापनावर) खर्च झालेले असोत; परंतु प्रकल्प पूर्ण

झाल्यावर होणारे एकूण नुकसान—पर्यावरणीय व सामाजिक—त्याच्या कित्येक पटीने अधिक आहे. या नुकसानीचा न पूर्णतः विचार केला गेला आहे, न ते थांबवण्याचा उपाय! अशा स्थितीत या प्रकल्पास पुढे रेटण्याचा भरपूर प्रयत्न सरकारकडून आजही केला जात आहे! परंतु आम्हीही आज निश्चिय करीत आहोत की सरदार सरोवराच्या रूपाने आमच्यावरच नव्हे तर संपूर्ण देशावरच चालून येणाऱ्या या संकटाचा आम्ही पूर्ण ताकदीसह सामना करू!

सरदार सरोवर रोखून धरू!

मरु पण उठणार नाही! नर्मदा खोरे सोडणार नाही!

आपणास निवेदन करीत आहोत की -

* आमचा हा निश्चिय आपण तात्काळ राज्य व केंद्र शासनापर्यंत पोहोचवावा.
* १९६०-६१ मध्येच केवडिया कॉलनी व इतर कामांसाठी बाधित केल्या गेलेल्या गुजरातच्या सहा गावांना तात्काळ प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित करून आजवरच्या सर्व ठराव तरतुदींनुसार त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे.
* या व्यतिरिक्तच्या इतर सर्वच गावांमधील (महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात) भूसंपादन तसेच पुनर्वसनाची सर्व कार्यवाही ताबडतोब थांबवण्यात यावी.
* सरदार सरोवर प्रकल्प रद्द केल्याचा निर्णय सरकारतर्फे घोषित करण्यात यावा.

**नर्मदा घाटी नवनिर्माण समिति,**
**मध्यप्रदेश**

**नर्मदा धरणग्रस्त समिती,**
**महाराष्ट्र**

**नर्मदा (स. सरोवर) असरग्रस्त संघर्ष समिती**
**केवडिया, भरुच, गुजरात**

**ऑगस्ट '८८**

## ५. सरदार सरोवर प्रकल्प : घटनाक्रम

| | |
|---|---|
| १. १९४६-१९६० | नर्मदेतील पाण्याच्या वापराची शक्यता अजमावून, केंद्रीय जलविद्युत आयोगाबरोबर संभाव्य योजनांचा विचार |
| २. १९६० | केंद्रीय नियोजन आयोग (प्लॅनिंग कमिशन) कडून नवागाम येथे पहिल्या टप्प्यात १६२ फूट पूर्ण जलाशय पातळीच्या (FRL) धरणासाठी (किंमत अंदाजे ३५०० लाख) व ३२० फुटापर्यंत वाढवण्याच्या पुढच्या टप्प्यासाठी जरूरी असे पायाचे बांधकाम करण्यासाठी गुजराथ सरकारला मंजुरी |
| ३. १९६०-६१ | प्रकल्प कचेऱ्या, कर्मचारी निवास इ. बांधण्यासाठी (केवडिया कॉलनी) व धरणाच्या पायाबांधणीसाठी गुजरात मधील सहा गावांमधील (४ पूर्ण, २ अंशतः) जमिनी संपादित; गावकऱ्यांना प्रकल्पग्रस्त न धरता, भूसंपादन कायद्यानुसार पण अत्यंत कमी आर्थिक मोबदला जमिनींसाठी दिला. |
| ४. १९६३ | गुजरात सरकारकडून धरणाची उंची (FRL) ४६० फुटांवर नेण्याची योजना प्रसृत; मध्यप्रदेश सरकारचा विचारांती विरोध. |
| ५. १९६४ | नर्मदेतील पाण्याच्या वापराची संपूर्ण योजना बनविण्यासाठी, अमंलबजावणीचा आराखडा तयार करण्यासाठी खोसला समिती स्थापन |
| ६. सप्टें. १९६५ | खोसला कमिटी रिपोर्ट जाहीर-नवागाम धरणाची उच्चतम जलाशय पातळी ५०० फुटांची असावी असा निर्णय. (मध्य प्रदेश व महाराष्ट्र यांना अमान्य) |
| ७. ऑक्टो. १९६९ | नर्मदा पाणीतंटा न्यायाधिकरण स्थापन. |
| ८. १९७९ | राज्यांच्या हरकतींच्या सुनावणीनंतर न्यायाधिकरणाचा अंतिम निवाडा जाहीर. |
| ९. १९७८-७९ | आर्थिक साहाय्य देण्याची शक्यता अजमाविण्यासाठी जागतिक बँकेच्या पाहणीपथकाची भेट. |
| १०. १९८०-८६ | नव्याने स्थापन झालेल्या केंद्रीय जंगल व पर्यावरण विभागाने पर्यावरणीय बाजू/परिणामांविषयी मुद्दे उपस्थित करून, संशोधन/माहितीची आवंश्यकता मांडली. त्यानुसार सरदार सरोवरासंबंधी काही पर्यावरणीय, सामाजिक अभ्यासांना सुरवात—बरेचसे सरकारी यंत्रणेमार्फत, काही स्वतंत्र संस्थामार्फत. |
| ११. ऑगस्ट ८१ | मध्यप्रदेश व गुजरातच्या मुख्यमंत्र्यांमध्ये ''विस्थापितांची समस्या सोडवण्यासाठी आवश्यक तर सरदार सरोवर व नर्मदा सागर प्रकल्पांबाबत विविध पर्यायांचा विचार केला जाईल'' अशा आशयाचा करार. |

१२. १९८३ प्रकल्पाचे आर्थिक मूल्यांकन (लाभ-हानीचे विश्लेषण) टाटा आर्थिक सल्लागार संस्थेतर्फे पूर्ण.

१३. १९८३-८५ जागतिक बँकेस आर्थिक साहाय्यासाठी योजना सादर व करारासंबंधी वाटाघाटी चालू.

१४. १९८३ गुजरातेतील प्रकल्पग्रस्तांची मोठी परिषद/मोर्चा- पुनर्वसनासंबंधी मागण्या.

१५. मे १९८५ धरण, वीजप्रकल्प व कालवेयोजना यांसाठी मिळून ४५०
दशलक्ष डॉलर्सचे कर्ज देण्याचा भारत सरकार तसेच गुजरात, महाराष्ट्र मध्यप्रदेश या तिन्ही राज्य सरकारांचा जागतिक बँकेबरोबर स्वतंत्र करार.

१६. १९८५ केंद्रीय जल आयोगाची सरदार सरोवरला अधिकृत मंजुरी

१७. फेब्रु १९८६ नर्मदा धरणग्रस्त समितीची महाराष्ट्रात स्थापना.

१८. जाने. १९८६ जागतिक बँकेचा करार (कर्जावरील व्याजासह) लागू.

१९. १९८६ धडगाव येथे महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांची मोठी मागणी परिषद. प्रकल्पग्रस्तांची घरे उठवण्यास व पैशात भरपाई स्वीकारण्यास एकजुटीने विरोध चालू. मध्यप्रदेशातही 'नर्मदा घाटी नवनिर्माण समिती, तर्फे प्रकल्पग्रस्तांचे संघटन कार्य चालू

२०. एप्रिल १९८६ केंद्रीय पर्यावरण विभागातर्फे प्रकल्पास मंजुरी रोखण्याचा निणर्य व पूर्व अटी जाहीर.

२१. जाने. '८७ प्रकल्पाचे संपूर्ण अध्ययन तसेच पुनर्वसन आणि पर्यावरणीय संरक्षण योजना तयार होईपर्यंत मंजुरी रोखून धरण्याविषयी सहा प्रमुख पर्यावरणवाद्यांतर्फे जाहीर निवेदन.

२२. १३ एप्रि. '८७ पंतप्रधान व तिन्ही राज्यांचे मुख्यमंत्री यांच्यातील बैठकीत सरदार सरोवर व नर्मदासागर या धरणांना मंजुरी देण्याची गरज असण्याचा निर्णय.

२३. जून '८७ अनेक अध्ययने १९८९ पर्यंत पूर्ण होणार नसल्याने, केंद्रीय पर्यावरण विभागातर्फे सशर्त मंजुरी (परिशिष्ट क्र.२)

२४. जुलै/ऑग. '८७ पुनर्वसनासंबंधीच्या अपुऱ्या तयारी/आयोजना विषयी टीका करणारे व अपेक्षा स्पष्ट करणारे कडक पत्र जागतिक बँकेने भारत सरकारकडे पाठविले.

२५. ऑक्टो. '८७ केंद्रीय विभागातर्फे जंगलजमीन वापरण्यास सशर्त मंजुरी (परिशिष्ट क्र.२)

२६. नोव्हें. '८७ महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील विस्थापितांच्या संघटनांतर्फे केंद्रीय नर्मदा कंट्रोल अथॉरिटीस मागणी पत्रक सादर.
जागतिक बँकेचे अध्यक्ष कॉनेबल यांच्याशी विस्थपितांचे प्रतिनिधी, पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते यांची भेट आणि प्रामुख्याने 'नर्मदा' प्रकल्पावर चर्चा.

२७. डिसेंबर १९८७ — गुजरात शासनाचे काही महत्त्वपूर्ण ठराव : भूमिहीन परिवारास ५ अेकर जमीन. अतिक्रमित जमिनीबद्दल किमान (३ अेकरांऐवजी) ५ एकर जमीन; पुनर्वसनानंतर दोन वर्षे कुटुंबास १५ रुपये रोजप्रमाणे विशेष भत्ता.

२८. ३० जाने. '८८ — महाराष्ट्र, मध्यप्रदेश व काही गुजरातचे मिळून सुमारे ४००० प्रकल्पग्रस्तांचा केवडिया येथे मागणीपत्रकास पाठिंबा दर्शविणारा भव्य मोर्चा व परिषद.

२९. फेब्रुवारी '८८ — मध्यप्रदेशातील नर्मदा खोरे विकास प्राधिकरणचे अध्यक्ष श्री. एस. सी. वर्मा यांचा सरकारची पुनर्वसनाची तयारी दिसत नाही म्हणून राजीनामा.

३०. १४ मे '८८ — नर्मदा कंट्रोल अथॉरिटी तसेच तिन्ही राज्यांतील प्रमुख अधिकाऱ्यांची विस्थापितांच्या प्रतिनिधींसह मागण्यांवर विस्तृत चर्चा.

३१. १५ मे '८८ — ''जुलै अखेरपर्यंत निर्णय द्या अथवा प्रकल्पविरोधी आंदोलनास सामोरे जावे लागेल'' — सहभागी संघटनांचे नर्मदा कंट्रोल अथॉरिटीस लेखी निवेदन.

३२. एप्रिल १९८८ — गुजरात शासनाचे स्थानिक अधिकारी डिसेंबर '८७ च्या ठरावातील तरतुदी नाकारत असल्याचे 'छात्र युवा संघर्ष वाहिनी'चे जाहीर निवेदन व निषेध.

३३. मे १९८८ — गुजरात शासन ठराव अंमलात आणत नसल्याबद्दल 'वाहिनी'तर्फे संमेलन व जरूर तर संघर्षाची/प्रकल्पाचे बांधकाम रोखण्याची घोषणा.

३४. मे/जून '८८ — गुजरात शासनातर्फे पुन्हा काही ठराव : त्यापैकी एक, गुजरातच्या सर्व ठरावांतील तरतुदी महाराष्ट्र व म. प्रदेशातून गुजरातमध्ये येणाऱ्या सर्व विस्थापितांना लागू करण्याबाबतचा ठराव.

३५. १८ ऑग. '८८ — नर्मदा घाटी नवनिर्माण समिती, (म. प्रदेश,) नर्मदा धरणग्रस्त समिती, (महाराष्ट्र)
नर्मदा (स. सरोवर) असरग्रस्त संघर्ष समिती (गुजरात) तर्फे संबंधित तहसील कचेऱ्यांवर मोर्चा व निवेदन देऊन प्रकल्पास संपूर्ण विरोध जाहीर केला.

३६. २-३ सप्टें '८८ — सरदार सरोवर आणि नर्मदा सागर या दोन्ही धरणांना स्थगिती मिळावी म्हणून मुंबई येथे
'धरणे' - महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांना ठराव सादर.

३७. १२ सप्टेंबर '८८ — काही पर्यावरण तज्ज्ञ, अभ्यासक व विस्थापितांच्या प्रतिनिधींची पंतप्रधानां-बरोबर संकल्पित भेट. भारतातील विविध क्षेत्रांतील अनेक नामवंत व्यक्तींकडून दोन्ही प्रकल्पांचा फेरविचार करण्याबाबत पंतप्रधानांना आवाहन. (पंतप्रधानांची भेट होऊ शकली नाही.)